# गाडगीळ

## आणि

# भारतीय लोकशाहीचे अर्थशास्त्र

१९६२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २९१२

मूळ लेखक :

भाई श्री. अ. डांगे

मराठी भाषांतर :

वसंतराव तुळपुळे

REFBK-0018448

केसरी प्रकाशन, पुणें

१८४४८

५५१६३ / २५।५७ — [illegible]

२०.१२

# गाडगीळ

## आणि

# भारतीय लोकशाहीचे अर्थशास्त्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
७९१६३ ... २१९२ ... २५/...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१८०५८
REFBK-0018448

मूळ लेखक :

भाई श्री. अ. डांगे

मराठी भाषांतर :

वसंतराव तुळपुळे

केसरी प्रकाशन, पुणें

मूल्य २॥ रुपये

प्रकाशक व मुद्रक
ज. श्री. टिळक, केसरी प्रकाशन, केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ, पुणें ३०

# प्रकाशकांचे चार शब्द

प्रा ध रा गाडगीळ याच्या आकस्मिक निधनानतर त्याच्या स्मृतीस श्रद्धाजली वाहणारे अनेक गौरवपर लेख गेल्या वर्षात प्रकाशित झाले परतु त्याच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विचारावर चिकित्सक, अभ्यासात्मक लिखाण अजून फारसे प्रकाशित झालेले नाही कदाचित् अशा लिखाणाकरिता आणखी काही काळ लोटणे आवश्यक असेल याला एकच अपवाद म्हणजे भाई डागे याची प्रस्तुत पुस्तिका प्रा गाडगिळाच्या निधनानतर अवघ्या एक महिन्यात भाई डांग्यांनी 'गाडगीळ अँड दी इकॉनॉमिक्स ऑफ इडियन डेमॉक्रसी' हा दीर्घ निबध लिहून पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध केला विषयाचे महत्त्व आणि अनेक मराठी वाचकांना त्याविषयी असलेली जिज्ञासा लक्षात घेऊन त्याचे मराठी भाषातर या पुस्तिकेच्या रूपाने केसरी प्रकाशन आज प्रा गाडगिळाच्या प्रथम श्राद्धदिनी प्रकाशित करीत आहे

प्रा गाडगिळाच्या निधनानतर इतक्या थोड्या अवधीत त्याच्या विचारप्रणालीपैकी एका महत्त्वाच्या, किंबहुना केंद्रीय पैलूचे विवेचन व विश्लेषण करणाऱ्या या निबधाबद्दल भाई डागे याचे अभिनदन करावयास हवे अशा तऱ्हेच्या लिखाणावर लेखकाची स्वत'ची वैचारिक पार्श्वभमी आणि भूमिका यांची छाया पडणे साहजिक असते भाई डाग्याच्या लिखाणात तर ते अपरिहार्य आहे तो या निबधाचा दोष नसून गुण आहे असे मी मानतो प्रा गाडगीळ याचे विचार आणि त्यावर भाई डागे यांचे निरूपण अथवा भाष्य अशा दोन्ही दृष्टींनी या निबधाचे महत्त्व आहे

भाई डांगे म्हणतात त्याप्रमाणे "मक्तेदारी भाडवलशाही नष्ट झाल्याशिवाय भारताचा विकास वेगाने होणार नाही " या मुद्द्यावर प्रा गाडगिळानी प्रथमपासूनच भर दिला होता किंबहुना मक्तेदारी भाडवलशाहीच नव्हे, तर आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सास्कृतिक सर्व क्षेत्रात जेथे जेथे मक्तेदारी आहे तेथे तेथे प्रा गाडगिळांनी तिच्यावर सतत प्रहार केले आहेत. परतु एवढ्या आधाराने भाई डांगे.

प्रा गाडगिळाना बळेच आपल्या क्रांतिकारक लोकशाहीकडे ओढीत आहेत असे वाटते सर्व क्षेत्रातील मक्तेदारी नष्ट करून जी नवीन सामाजिक व आर्थिक पुनर्रचना करावयाची तिच्याकरिता प्रा. गाडगिळांची भिस्त भाई डांग्याना अभिप्रेत असलेल्या क्रांतिकारक लोकशाहीपेक्षा सहकार, सर्वोदय आणि काही प्रमाणात जुना उदारमतवाद यावरच अधिक होती, असे मला वाटते प्रस्तुत निबधविषयाच्या सदर्भात भाई डांग्यांनी प्रा गाडगिळाच्या या वैचारिक अगाची नीटशी दखल घेतलेली दिसत नाही

तात्पर्य दिसते ते असे की, भाई डांग्याना प्राप्त परिस्थितीत जे निष्कर्ष अटळ वा अपरिहार्य वाटत होते आणि वाटतात ते प्रा गाडगिळाना तसे वाटत नसावेत आणि म्हणूनच ते इतर पर्यायांचा विचार करीत. प्रा गाडगिळानी भाई डांग्याना हात जोडून "मी त्यातला नाही" म्हणून जे सांगितले तेच खरे ही हकीकत सन १९३६ सालची आहे त्यानतर ३५ वर्षांनी सन १९७१ साली भाई डागे तोच प्रश्न पुन्हा विचारते, तर मला वाटते, प्रा गाडगिळांनी पुनश्च हात जोडून त्याना तेच उत्तर दिले असते

याची जाणीव असूनहि भाई डांग्यानी त्याच्या मनात प्रा गाडगीळ याच्याविषयी असलेल्या आदरभावामुळे त्याना जे मोलाचे वाटते ते प्रा. गाडगिळाच्या गळयात घालण्याचा यत्न केला आहे प्रा गाडगीळ आज हयात असते तर त्यानी त्याच भावनेने त्यांचे सुपरिचित स्मित करून त्याचा स्वीकार केला असता

प्रा गाडगिळांचे व्यक्तिमत्व आणि विचारप्रणाली इतकी सर्वंकष व सर्वस्पर्शी होती की, त्यांचा चिकित्सक अभ्यास होणे आता आवश्यक आहे भाई डांग्यांनी या दीर्घ निबधाने या अभ्यासास सुरुवात केली म्हणून त्याचे अभिनदन आणि आभार मानावयास हवेत

भाषातरकर्ते श्री. वसतराव तुळपुळे, मूळ प्रकाशक पीपल्स पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, इत्यादींचे आभार

दि २ मे १९७२ वि. म. दांडेकर



कै. प्रा. धनंजयराव गाडगीळ

जन्म : १० एप्रिल १९०१ मृत्यु ३ मे १९७१

७९१६३
२१९२
निबंध-
२५।८८

# प्रस्तावना

[मूळ इंग्रजी पुस्तिकेला लिहिलेली]

गेल्या महिन्याच्या याच तारखेला श्री डी आर् गाडगीळ पुण्याला परतत असतांना गाडीतच निधन पावले. नियोजन-मंडळाचें प्रमुख-पद भूषविणारा, मक्तेदारी भांडवलशाहीवर कठोर प्रहार करणारा हा विद्वान दिल्लीच्या निरंकुश सत्ताधाऱ्यांना पचला नाही. त्यांना राजीनामाच द्यावा लागला तेथून ते आपल्या गोखले इन्स्टिटयूटकडे परतत असतांना गाडींतच त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांतच त्याचें निधन झालें निधनसमयी त्यांच्या पत्नी त्यांच्याजवळ होत्या.

१९३६ सालीं प्रदीर्घ कारावासातून सुटल्यानंतर मी विश्रांतीसाठी आणि इतिहासाच्या संबंधांत काही वाचन करण्यासाठी म्हणून पुण्याला मुक्काम केला होता त्या वेळी श्री गाडगीळांची आणि माझी ओळख झाली त्या वेळी माझ्या कामासाठी मी भारत सेवक समाजाच्या (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या) ग्रंथालयांत जात असे. तेथेच श्री एन्. एम् जोशी यांनी माझी श्री गाडगीळ, वझे प्रभृतींशीं ओळख करून दिली.

७५९६३
२१९२
निबंध-
२५१

# प्रस्तावना

[मूळ इग्रजी पुस्तिकेला लिहिलेली]

गेल्या महिन्याच्या याच तारखेला श्री डी आर् गाडगीळ पुण्याला परतत असतांना गाडींतच निधन पावले. नियोजन-मडळाचे प्रमुख-पद भूषविणारा, मक्तेदारी भाडवलशाहीवर कठोर प्रहार करणारा हा विद्वान दिल्लीच्या निरकुश सत्ताधाऱ्याना पचला नाही त्याना राजीनामाच द्यावा लागला तेथून ते आपल्या गोखले इन्स्टिटयूटकडे परतत असताना गाडींतच त्याना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचें निधन झालें निधनसमयी त्याच्या पत्नी त्याच्याजवळ होत्या

१९३६ सालीं प्रदीर्घ कारावासांतून सुटल्यानतर मी विश्रांतीसाठी आणि इतिहासाच्या सबधांत काही वाचन करण्यासाठी म्हणून पुण्याला मुक्काम केला होता त्या वेळीं श्री गाडगीळांची आणि माझी ओळख झाली त्या वेळीं माझ्या कामासाठी मी भारत सेवक समाजाच्या (सर्व्हंट्स ऑफ इडिया सोसायटीच्या) ग्रथालयात जात असे तेथेच श्री एन्. एम् जोशी यानी माझी श्री गाडगीळ, वझे प्रभृतींशीं ओळख करून दिली

गाडगीळ त्या वेळीं भारत सेवक समाजात अर्थशास्त्रावर, व्याख्यानें देत असत तीं मी कधी कधी ऐकावयास वसत असे परंतु प्रामुख्याने आमची मुलाखत दुपारी चहाच्या वेळींच होई तेव्हाच माझ्या हें ध्यानात आलें होतें की, गाडगिळाच्या विवेचनात नेहमीच्या चाकोरीच्या बाहेरची अशी विशिष्ट तर्कपद्धति आहे, परंतु आपल्या विषयाची पाया-शुद्ध माडणी केल्यानतर त्यापासून अटळपणें आणि अपरिहार्यपणे निघणारे निष्कर्ष काढण्याचें सोडून देऊन, मूळ धागा बाजूला ठेवून गाडगीळ इतर अनेक पर्यायांवरच चर्चा करीत या अपरिहार्य निष्कर्षांना जर ते चिकटून राहते तर भाडवलशाही अर्थशास्त्रीय विचारापेक्षा ते शास्त्रीय समाजवादी विचाराच्याच जास्त निकट आले असते

चहा घेतांना जेव्हा जेव्हा हा विचार मी त्यांच्या समोर माडी आणि ही लक्ष्मणरेषा ते का सोडीत नाहीत असें विचारी तेव्हा ते आपल्या सुपरिचित मराठी पद्धतीने हात जोडून म्हणत, "मी आहे तेथेच बरा आहे ती रेषा ओलांडणें हें तुमच्या सारख्यांचें काम मी त्यातला नाही"

आणि तरीसुद्धा ते आरामखुर्चीत बसणारे आळशी विचारवंत नव्हते शेतकऱ्याचे हितसबध, जमिनीचे प्रश्न, सहकारी चळवळीचा विकास, भाषावार प्रांतरचना यांसारख्या प्रश्नावर ज्या चळवळी झाल्या त्याच्याशी त्यानी सहकार्य केलें या सबधात ते अत्यत निर्भयपणें आणि जिद्दीने आपलें म्हणणे माडीत परंतु राजकारणाच्या प्रत्यक्ष धिगामस्तीत भाग घ्यावयाचा नाही असा आपल्यापुरता निर्णय त्यानी केला होता

१९३७ साली बॉंबे टेक्स्टाईल इन्क्वायरी कमिटीवर त्याची नेमणूक झाली तेव्हा त्याच्यावरोबर एकत्र विचारविनिमय करण्याचा पुन्हा एकदा योग आला १९३० सालच्या मदीच्या काळात गिरणी-माल-कानी कामगारांच्या वेतनात जी २५ टक्के कपात केली होती, ती रद्द करून शिवाय जादा वेतनवाढ मिळावी अशी मुंबईच्या गिरणी काम-गाराची मागणी होती व त्यासाठी तो आपल्या गिरणी-कामगार युनि-यनच्या नेतृत्वाखाली लढा देत होता गिरणी मालकाचें असे म्हणणें होते की, अजूनहि त्याच्या गिरण्या तोटयातच चालत आहेत, आणि

त्यामुळे कामगाराना काहीहि वाढ देणें त्याना परवडणार नाही या कमिटीसमोर दिलेल्या साक्षीत मी, कपन्या आपले नफे दडवून खोटे हिशेब दाखवीत आहेत, असें ठामपणे माडून कपनीच्या आर्थिक परिस्थितीची सपूर्ण छाननी व्हावी अशी मागणी केलेली होती

गाडगिळानी हा प्रश्न हातीं घेतला हिशेबाची छाननी करताना त्याना असे आढळून आलें की, गिरणी-मालक आपल्या सट्टेबाजीच्या व्यवहाराची फिरवाफिरवी करून आपल्या गिरण्याच्या हिशेबांत लबाडीने तोटे दाखवीत आहेत हें पाहून त्याना आश्चर्याचा धक्का बसला त्यानतर गाडगिळानी प्रत्येक गिरणीच्या आर्थिक व्यवहाराची छाननी करून असें दाखवून दिलें की, केलेली पगारकाट रद्द करण्याइतका नफा गिरण्याना होत आहे त्यांच्या प्रयत्नामुळेच जयरामदास दौलतराम याच्या अध्यक्षतेखालच्या या कमिटीने आम्हांला २५ टक्के पगारवाढ दिली याबाबत गाडगिळानी जी भूमिका घेतली तिच्यापासून गिरणी मालकाच्या प्रतिनिधीनी अनेक प्रयत्न केले तरीहि ते विचलित झाले नाहीत या प्रश्नाचा सखोल अभ्यास करून त्यांनी जी तर्कशुद्ध माडणी केली त्यामुळेच कमिटीच्या इतर सभासदांना, आमच्या मागणीची न्याय्यता पटून ती मान्य झाली"

अर्थशास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून गाडगीळ सुप्रसिद्ध होते. परतु खरे गाडगीळ विद्यार्थ्यांना शिकविलेच जात नाहीत किंवा त्यांची खरी प्रतिमा जनतेसमोर ठेविली जात नाही

राजकीय पक्षांनी आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणाऱ्या तरुण क्रांतिकारक विचारवतानी गाडगिळाच्या लिखाणाची 'राजकीय दखल' घेतली नाही याचें कारण आपले खरे विचार प्रकट करतांना ते पुष्कळ वेळेला समजावयास जरा कठीण अशा नागमोडी भाषापद्धतीचा अवलब करीत परतु नियोजनाच्या आणि भारताच्या अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेच्या प्रश्नावर जेव्हा आपलें मनोगत माडणें त्यांना भाग पडलें तेव्हा आटोकाट प्रयत्न करूनहि ते आपल्या अतर्यामीच्या भावना झाकू शकले नाहीत

अशा वेळीं, मक्तेदारी भांडवलशाहीच्या उघडपणें विरुद्ध बोलणें, वर्गीय दृष्टिकोणाची गरज प्रतिपादन करणें, सामाजिक क्रांति हेंच उद्दिष्ट असलेल्या राजकीय पक्षाची आवश्यकता आहे हें मांडणें आणि नोकरशाही आणि मक्तेदारी भांडवलशाही हेच देशाच्या विकासाचे व खऱ्या लोकशाहीचे प्रमुख शत्रु आहेत हें ठामपणें सांगण्याचें त्यांनी टाळलें नाही त्या प्रसंगी सत्ताधारी वर्गानें चालविलेली जनतेची आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची लूट, कांहींहि आडपडदा न ठेवता अगदी नग्न स्वरूपात, जनतेसमोर उघडपणें मांडण्यास ते कचरले नाहीत त्यांच्या मताने विद्यार्थी, शेतकरी, बेकार, बुद्धिजीवी आणि इतर जनविभाग या सर्वांच्या दु स्थितीचें एकच कारण होतें व तें म्हणजे मक्तेदारी भांडवलशाही आणि तिची सेवाचाकरी करणारी राजसत्तेची विषवल्ली त्यांनी नियोजन-मंडळाला जीं निवेदनें सादर केलीं त्यात, त्यांच्या विशिष्ट भाषाशैलीमधून सुद्धा, त्यांच्या आत्यंतिक संतापाची धग आणि त्यांनी घातलेले बौद्धिक घणाचे मर्मभेदक घाव जाणवल्याशिवाय राहत नाहीत

आपले म्हणणें ऐकून घेतलें जाईल अशी खात्री त्यांना नव्हती तरी पण प्रयत्न करून पाहावा असें त्यांना वाटलें म्हणूनच नियोजन-मंडळाचें उपाध्यक्षपद स्वीकारण्याचें त्यांनी मान्य केलें. परंतु त्यांना वाटत होतें तसेंच घडलें मक्तेदार भांडवलाने त्यांची गळचेपी केली.

गाडगिळांच्या या निवेदनाचा सारांश लिहावा असे अनेक दृष्टींनी मी ठरविलें त्यांचे सर्व लिखाण किंवा त्यांच्या विचारपैलूंचा विकास कसकसा होत गेला अशी अष्टपैलू रचना या निबंधाची नाही. तर गाडगिळांच्या विचार-विकासाची अंतिम व परिपक्व अवस्था यावर लक्ष केंद्रित केलें आहे

प्रथमपासून गाडगीळ, ज्याला आपण भांडवली अर्थशास्त्रीय विचारसरणी असे म्हणतों त्या विचारसरणीचे होते. परंतु त्यांना मिळालेल्या ऐतिहासिक अनुभवातून ते बदलले त्यानंतर मात्र चाकोरींत फिरणाऱ्या सरकारी अर्थशास्त्रज्ञाप्रमाणे, भांडवलशाही अर्थशास्त्राच्या दिवाळखोरीत निघालेल्या सिद्धान्तांना ते चिकटून राहिले नाहीत. गाडगिळांनी

कीन्स, जोन रॉबिन्स इत्यादि अर्थशास्त्रज्ञांनी प्रतिपादिलेल्या निरनिराळ्या साधनाचा उपयोग केला यांत शंका नाही परंतु मक्तेदारी भांडवलशाहीच्या स्वरूपावर गाडगिळांनी जसा विदारक प्रकाश टाकला तसा वरीलपैकी कोणीच टाकला नाही मूलत गाडगीळ विकसनशील राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा, भांडवलशाही साम्राज्यशाहीच्या राजकीय लष्करी मगरमिठींतून सुटून नुकत्याच बाहेर आलेल्या भारताच्या अर्थव्यवस्थेचा विचार करीत होते याच दृष्टीने त्यांनी भारतासमोरील समस्या सोडविण्यासाठी सैद्धान्तिक प्रपंच केला त्या वेळीं त्यांच्या असे ध्यानांत आलें की, एकंदर परिस्थितीवर, मक्तेदारी भांडवलशाहीवर जोरदार हल्ला चढविणें हाच मूलभूत तोडगा आहे आणि हा आपला निष्कर्ष गाडगीळांनी जितक्या स्पष्टपणे आणि सातत्याने मांडला तसा इतर कोणत्याहि प्रथितयश अर्थशास्त्रज्ञाने मांडला नाही.

आपल्या मुख्य शत्रूचा अशा रीतीने एकदा शोध लागल्यानंतर, गाडगिळांनी त्याचे दोस्त कोण आहेत त्याचीं अवजारें आणि हत्यारें कोणती आहेत आणि तो राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या रन्ध्रारन्ध्रात चोरटेपणाने प्रवेश करून तिचें स्वत च्या अभिवृद्धीसाठी शोषण कसें करतो याचा अभ्यास करून त्याचे स्वरूप स्पष्ट केलें

यासाठीच त्यांना शासनसंस्था, नोकरशाही, परकी भांडवल, किंमती, बाजारपेठा, जमिनीच्या संबंधातले कायदे व त्यांतील सुधारणा, वेतन, पगार, लघु आणि मध्यम उद्योग इत्यादि अनेक प्रश्नांचा ऊहापोह करावा लागला ही नवी सामाजिक क्रांति झाल्यानंतर आणि मक्तेदारी भांडवलशाहीचा नाश करून भारतीय अर्थव्यवस्था आणि राजकारण यांची पुनर्रचना केल्यानंतर भारतीय लोकशाही कशी असेल याचें संपूर्ण चित्र गाडगिळांनी आपल्यासमोर ठेविलें आहे

गाडगिळांच्या कल्पनेत असलेल्या या लोकशाहीला मीं नाव दिलेलें नाही त्यांनीहि दिलें नव्हतें निरनिराळ्या नावाच्याच केवळ नव्हेत तर निरनिराळ वर्गीय आशय आणि निरनिराळे वर्गसंबंध असलेल्या लोकशाहीची निरनिराळी स्वरूपे यासंबंधी सध्या चर्चा सुरू आहे

राष्ट्रीय लोकशाही, जनतेची लोकशाही, समाजवादी लोकशाही ही त्यांतल्या काहींची नावे आहेत आज जी भारतात अस्तित्वात आहे ती भांडवली लोकशाही आहे

या विषयाची चर्चा येथे करतां येणार नाही त्यासाठी हें ठिकाण योग्य नाही कारण गाडगिळांच्या कल्पनेंत जी लोकशाही होती तिला नांव शोधण्याचा प्रश्न त्यांनी स्वत कधी निर्माणच केला नाही भारतांत आज अस्तित्वात असलेल्या लोकशाहीत सर्वत्र मक्तेदारी आणि नोकरशाही यांचा जो बुजबुजाट झाला आहे त्या ठिकाणी नवा आशय कोणता घालावा एवढाच प्रश्न गाडगिळांनी स्वत समोर ठेवला होता. या निबधांत त्यांच्या लिखाणातील अनेक उतारे उधृत करुन त्यातून गाडगिळांना अभिप्रेत असलेला नवा आशय मीं वाचकांच्या समोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे

माझें मत असें आहे की, गाडगिळांनी त्यांच्या समाजवादी दृष्टिकोण आणि मिश्र अर्थव्यवस्था यासबधीच्या विचारातून जी सामाजिक-आर्थिक समाजरचना सुचविली तिचीं सर्व वैशिष्टचें आणि तिचा गाभा याचा जर विचार केला तर आपणास असें आढळून येईल की, गाडगीळ मक्तेदारी भांडवलशाही उखडून टाकल्यानतर जन्माला येणाऱ्या क्रांतिकारक लोकशाहीचेंच ' वर्णन करीत आहेत या निबधातून ही गोष्ट आपल्या समोर येत असल्याने या ठिकाणी त्यावर मीं जास्त वेळ घालविण्याचे कारण नाही

या लोकशाहीला मी दिलेले नाव किंवा त्याचा मी लावलेला अर्थ सर्वांनी मानलाच पाहिजे असा माझा आग्रह नाही गाडगिळांच्या विचारपद्धतीला मीं दिलेल्या नावाने बिचकून न जाता अर्थशास्त्राच्या तरुण आणि प्रौढ अभ्यासकाना तिचा विचार करता येईल आणि योग्य मूल्यमापन करुन तिचा स्वीकार करता येईल

दुसऱ्या महायुद्धानतरच्या काळात समाजवादी समाजरचनाची जगभर ताकद वाढणे, साम्राज्यशाहीची ताकद कमी होणे आणि राष्ट्रीय विमोचनाच्या ताकदींची सबंल सुरू असलेली यशस्वी वाटचाल या सर्वांमुळे आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक

नव-स्वतंत्र देशांतून लोकशाहीचीं नवीं नवीं स्वरूपे प्रकट होत असून त्या त्या देशातील आर्थिक आणि राजकीय वर्ग-संबधाना पोषक असा नवा आर्थिक आणि राजकीय आशयहि त्यातून व्यक्त होत आहे भारतातील मक्तेदारी भांडवलशाहीचा पाडाव झाल्यानंतर भारतहि खास आपली अशी वैशिष्टचपूर्ण लोकशाही निर्माण केल्याशिवाय राहणार नाही

गाडगिळानी हे अत्यंत अस्पष्टपणें केवळ सूचित केलें कारण त्याचा पुढे होणारा हा विकास हा त्याच्या पुढचा तातडीचा प्रश्न नव्हता. तेव्हा आपणहि प्रश्नाची ही बाजू वेगळ्या जागीं आणि वेगळ्या प्रसंगीं चर्चा करण्यासाठी राखून ठेवू या

गाडगिळाच्या निवेदनाचा साराश काढण्याचा हा खटाटोप मी करण्याला आणखी एक कारण आहे मक्तेदारी भांडवलशाही आणि नवस्वतंत्र देशातून विकसित होत असलेली परिस्थिति या संबधांत मार्क्स-लेनिन वादाची जी एक खास विचारपद्धति आहे तिला भांडवली जगातील प्रथितयश अर्थशास्त्रज्ञाचा स्वतंत्रपणे पाठिंबा मिळालेला पाहून माझ्यासारख्याला एक प्रकारचा रास्त अभिमान वाटतो आणि समाधान लाभते सामर्थ्यसंपन्न जागतिक समाजवादी समाजपद्धतीचाहि परिणाम गाडगिळाच्या सारख्याच्या विचारसरणीवर होत असतो नियोजित अर्थव्यवस्थेच्या कल्पनेला जन्म देण्याचे श्रेय सोव्हिएट युनियनच्या नियोजित अर्थव्यवस्थेलाच आहे ही वस्तुस्थिति आता सर्वांनी मान्य केलेली आहे

नेहरूनी अस्तित्वांत आणलेल्या नियोजन-मंडळातील अर्थशास्त्रीय विचारमंथनाला केवळ गाडगीळच नव्हेत तर प्राध्यापक बेटल्हिम आणि लँग यांच्या सारख्यानीहि हातभार लावला ही घटना केवळ अपघाती स्वरूपाची नाही खेदजनक गोष्ट ही आहे की, हे सर्व मंथन केवळ वैचारिक चौकटीतच अडकून पडले आणि त्याचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर करण्याचा जेव्हा जेव्हा प्रयत्न झाला तेव्हा तेव्हा मक्तेदारी भांडवलशाही आणि शासनसंस्थेतील तिचे हस्तक यानी आपल्या प्रचंड पाशवी शक्तीच्या जोरावर त्याचा चक्काचूर केला. जोंपर्यंत श्रमजीवि

जनता ही विचारसरणी आत्मसात करीत नाही तोपर्यंत इतर कोण-तीहि शक्ति मक्तेदारी भाडवलशाहीला नेस्तनाबूद करू शकणार नाही आणि दुसरें काही नाही तरी निदान मी गाडगिळाचे जे विचार या निबधात सक्षेपाने मांडले आहेत त्याचा उपयोग, एका सत्प्रवृत्त विद्वान्, कणखर विचाराच्या आणि आपल्या देशांतील कष्टकरी जन-तेच्या मित्राच्या मनांतील विचार आणि त्याच्या भावना, यांवर प्रकाश टाकण्यासाठी तरी खास होईल असा मला विश्वास आहे

३ जून १९७१ मुबई -एस्. ए. डांगे

१५५४८

# गाडगीळ आणि भारतीय लोकशाहीचें अर्थशास्त्र

- १ -

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि भारत सरकारच्या नियोजन मंडळाचे प्रमुख डॉ धनंजयराव गाडगीळ ता ३ मे १९७१ रोजीं दिल्लीहून पुण्याला येत असताना गाडींतच निधन पावले त्या प्रसंगी विद्वानाच्या वर्तुळातून आणि सरकारी क्षेत्रातून त्यांचें गुणगान करणारे अनेक संदेश प्रसिद्ध झाले. सगळ्यानी एक सुरांत म्हटलें की, भारत एका महान् अर्थशास्त्रज्ञाला मुकला आहे

आपण एका महान् अर्थशास्त्रज्ञाला मुकलों आहोंत ही गोष्ट खरीच परंतु गाडगिळाचें मोठेपण नक्की कशात होतें हें मात्र कोणीच सांगत नाही

या दुर्दैवी घटनेपूर्वी काही दिवस पंतप्रधानांनी गाडगिळांच्याकडून नियोजन-मंडळाच्या उपाध्यक्षपदाचा राजीनामा मागून घेतला होता आणि त्याच्या मृत्यूच्या आदल्याच दिवशीं त्यांनी आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्रचना करून नियोजन मंडळाचे नवे प्रमुख श्री. सी सुब्रमणियम् याना मंत्रिमंडळात सामील करून घेतलें होतें.

गाडगिळाची वैचारिक बैठक कणखर असल्यानें कोणत्याच मंत्रिमंडळाच्या चौकटीत ते बसणें शक्य नव्हतें आणि म्हणूनच त्याना त्यांतून सतत वगळण्यात आलें शिवाय कोणत्याहि मंत्रिमंडळात समाविष्ट

होण्यास ते स्वत हि सम्मत झाले नाहींत १९५५ साली, दुसरी पंच-वार्षिक योजना सुरू झाल्यापासून अर्थशास्त्रज्ञाच्या समितीचे प्रमुख या नात्याने नियोजनाची वैचारिक बैठक तयार करण्यात त्यानी सातत्याने आणि सक्रिय भाग घेतला. परतु तेव्हा सुद्धा सरकारात सामील होण्यास त्यांनी तितक्याच सातत्याने नकार दिला एकदा तर त्याना अर्थमंत्रिपद देण्याची कल्पना अनधिकृतपणे चर्चिलीहि गेली परतु त्याबाबत गाडगिळानी अगदीच उत्साह न दाखविल्याने ती बारगळली व नतर ती जागा श्री सी डी देशमुखाना देण्यात आली.

गाडगिळाच्यात काही उणीवा होत्या म्हणून त्याना नियोजन-मडळाच्या उपाध्यक्षपदावरून काढण्यात आले असे नाही किंवा वैफल्याची भावना निर्माण झाल्याने त्यांनी-आपण होऊन त्या पदाचा त्याग केला असेंहि नाही भारताचे अर्थमंत्री श्री यशवतराव चव्हाण यानी ता ७ मे १९७१ रोजी मुबईतील 'नवाकाळ' या मराठी दैनिकाला दिलेल्या मुलाखतींत म्हटलें आहे की, 'दिल्लीहून निघण्यापूर्वी जेव्हा मी गाडगिळाना भेटलो तेव्हा त्याच्या वागण्यात कोठेहि मला वैफल्याची किंवा कडवटपणाची भावना आढळली नाही " श्री यशवतराव चव्हाणांचे हे म्हणणे अत्यत खरें होतें पण मग प्रश्न असा निर्माण होतो की, या गोष्टीची अर्थमंत्र्याना अशा रीतीने मुद्दाम आवर्जून ग्वाही देण्याचें कारण काय होतें? हें मुद्दाम सागावे लागले याचा अर्थ कोठे तरी पाणी मुरत होतें

वस्तुस्थिति अशी होती की, गाडगिळाच्या मनात वैफल्याची भावना नव्हती हें खरें असले तरी आपल्या विचारसरणीचा पराभव झाला आहे असे मात्र त्याना जरूर वाटत होतें चार वर्षे नियोजन-मडळाचा अध्यक्ष म्हणून काम केल्यानतर त्याना हें कळून चुकलें की, एक अर्थ-शास्त्रज्ञ आणि भारताच्या विकसनशील अर्थव्यवस्थेचा अभ्यासक या नात्याने गेली पधरा वर्षे जो लढा आपण दिला तो आपण जिंकू शकत नाही

गाडगीळ कोणता लढा लढत होते आणि त्याचा कोठे पराभव झाला? काही काळ त्याना असें वाटलें की, निदान तत्त्वत तरी आपण हा लढा

जिंकत आहोंत आणि म्हणूनच नियोजन-मंडळाचे नेतृत्व स्वीकारण्याचें जे ते आतापर्यंत टाळीत होते तें स्वीकारण्यास त्यांनी मान्यता दिली. गाडगीळ अत्यंत प्रामाणिक आणि वस्तुनिष्ठ होते त्यांना परिस्थितीची उत्तम जाणीव असल्याने त्यांच्या हे झटकन् ध्यानात आलें की, आपल्याशीं तत्त्वतः सहमत असल्याचें जे सांगतात ते सुद्धा आपली मतें कृतीन उतरविण्यासाठी जी पावलें झपाट्याने टाकणें आवश्यक आहे तीं ते टाकीत नाहीत त्यांची अशी भावना झाली की, बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि त्यासारख्याच इतर कांही गोष्टी केल्या गेल्या असल्या तरी मध्यवर्ती ठिकाणीं आणि प्रांताप्रांतांतून सत्तास्थानी जे राजकीय गट आहेत त्यात असा एक प्रभावी विभाग आहे ज्याचा मक्तेदारी भांडवलशाहीचे बालेकिल्ले खऱ्या अर्थानें नेस्तनाबूद करण्यास खरोखर विरोधच आहे त्यांना राजीनामा देण्याची केली गेलेली विनंती आणि त्यानंतर घडलेल्या सर्व घटना यावरून त्यांना जे वाटत होते तशी वस्तुस्थिति होती हेच सिद्ध झालें

घराकडील पत्नीच्या प्रवासाचें त्यांनी तिकिट काढलें परंतु हा प्रवास ते पूर्ण करू शकले नाहीत त्यांचा प्रवास मधेच संपण्याची ही घटना, आपल्या अर्थव्यवस्थेचा, तथाकथित समाजवादी मार्गावर, आजच्या राज्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली, जो प्रवास चालू आहे त्याचे भविष्यात काय होणार हें सूचित करणारीच नाही काय ?

याच कारणासाठी या महान् अर्थशास्त्रज्ञात काय महान् होतें हे समजून घेणें आवश्यक आहे संबध आयुष्यांत त्यांनी कोणत्याहि राजकीय पक्षाचे सदस्यत्व स्वीकारलें नाही एवढेच नव्हे तर आपल्या इन्स्टिट्यूटच्या कोपऱ्यात ते जवळ जवळ लपून राहिल्यासारखे राहिले आणि आपल्या समोरील समस्या सोडविण्यासाठी त्यांच्या बुद्धिमत्तेची मदत मिळावी अशी जी लोकशाही मागणी जनतेने केली त्या मागणीनेच त्यांना त्यांच्या इन्स्टिट्यूटच्या कोपऱ्यातून खेचून बाहेर आणलें असें असलें तरी गाडगीळ कशासाठी झगडले हें सामान्य जनतेने आणि, बुद्धिजीवि वर्गाने सुद्धा समजून घेणे आवश्यक आहे

येथे मला गाडगिळांचें चरित्र लिहावयाचें नाही या ठिकाणी त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या नियोजनासबधी जें लिहिलें तें आणि त्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे पाहण्याचा त्याचा मूलभूत दृष्टिकोण एवढ्या मर्यादेचें बधन मी माझ्यावर घालून घेण्याचें ठरविलें आहे

— २ —

ब्रिटिशानी भारतांत निर्माण केलेलें दारिद्र्य जर घालवावयाचें असेल तर भारताने औद्योगीकरणाच्या मार्गावर झपाट्याने वाटचाल केली पाहिजे आणि शेती-सबधात आमूलाग्र बदल घडवून आणले पाहिजेत, या वस्तुस्थितीची गाडगिळाना सपूर्ण जाणीव होती या मूलभूत सिद्धान्ताबाबत निरनिराळ्या विचारप्रणालीच्या विद्वानात जरी एकमत होतें तरी त्यासाठी प्रारंभ कोठून आणि कसा करावयाचा या प्रश्नावर मात्र त्यांच्यात अत्यत तीव्र आणि मूलगामी मतभेद होते

महायुद्धानतरच्या कालाचा आणि पहिल्या पचवर्षीय योजनेचा निराशाजनक आणि कटु अनुभव घेतल्यानतर पडित नेहरूनी दुसऱ्या पचवार्षिक योजनेच्या आराखड्याबाबत कांही नवे दृष्टिकोण स्वीकारले त्याचाच परिणाम म्हणून गाडगिळाना अर्थतज्ज्ञाच्या कमिटीत काही नवी मडळी, नवे चेहरे दिसू लागले आणि त्यानी अर्थ-तज्ज्ञाच्या या कमिटीच्या कामकाजात भाग घेण्यास सम्मति दिली

दुसऱ्या पचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करताना पूर्वीच्या वैचारिक बैठकीचा सपूर्णतया त्याग करण्यात आलेला होता आणि त्यामुळे परकीय तसेच भारतीय मक्तेदार अत्यत अस्वस्थ झालेले होते या दुसऱ्या पचवर्षीय योजनेबाबत जीं पायाभूत रचनात्मक तत्त्वे होतीं त्याचा जर सपूर्ण स्वीकार केला गेला असता, तर त्यामुळे परकीय आणि एतद्देशीय मक्तेदारी हितसबधाच्या दृढमूल सत्तेला निश्चितपणें प्रचड हादरा बसला असता एवढेंच नव्हे, तर देशाच्या अर्थव्यवस्थेला, त्याच-प्रमाणे राजकारणालाहि नवी लोकशाही कलाटणी मिळण्यास प्रारभ

झाला असता हें ध्यानात घेऊन प्रतिगामी हितसंबंधियांनी दुसऱ्या पंचवर्षीय योजनेला विरोध करण्याची प्रचंड मोहीम उभारली

नियोजन-मंडळाने नियुक्त केलेल्या अर्थतज्ज्ञांच्या समितीने गाडगिळांना त्यांचे विचार मांडण्याची विनंती केली १९५५ च्या एप्रिल महिन्यात गाडगिळांनी मंडळाला एक निवेदन सादर केलें. त्यात त्यांनी आपले विचार मांडले आणि या विचाराचा त्यांनी अखेर-पर्यंत पाठपुरावा केला दुसरी पंचवर्षीय योजना संपूर्णपणें कार्यवाहीत न येऊ देण्यात आणि तिसरी व चौथी योजना आड रस्त्याला नेण्यात प्रतिगामी हितसंबंधियांनी यश मिळविलें परंतु गाडगिळांनी आपल्या विचाराचें मूळ सूत्र कधी सोडले नाही या मूळ सूत्राचा आशय क्रांति-कारक लोकशाही हा असल्याने अनेक ठिकाणाहून अगदी त्यांच्या विचारसरणीशीं सहमत असल्याचा देखावा करणाऱ्याकडून सुद्धा गाडगिळांना विरोध सहन करावा लागला

त्यांच्या विचारसरणीमागील मूलभूत भूमिका काय होती? ब्रिटि-शाच्यापासून ज्या अर्थव्यवस्थेचा वारसा भारताला प्राप्त झालेला होता त्या अर्थव्यवस्थेचा पाया त्यांना संपूर्णपणे उखडून टाकावयाचा होता त्याचप्रमाणे स्वातंत्र्यानंतरची सहा वर्षे प्रस्थापित हितसंबंधि-यांनी उन्माद चढल्याप्रमाणे जे अनिर्बंध संचारस्वातंत्र्य उपभोगिले तेंहि त्यांना संपुष्टात आणावयाचें होतें

त्यासाठी कोणत्या गोष्टीवर गाडगिळांनी भर दिला ?

"**मक्तेदारी भांडवलशाही नष्ट झाल्याशिवाय भारताचा विकास वेगाने होणार नाही**" हा पहिला आणि मूलभूत मुद्दा त्यांनी अत्यंत ठामपणाने मांडला.

भारतातील मक्तेदारी भांडवलशाही असें म्हणताना त्या शब्दाचा कोणता अर्थ गाडगिळांना अभिप्रेत होता ? 'खासगी उद्योग या शब्दाला बराच व्यापक अर्थ असून त्यात अनेक प्रकारच्या खासगी उद्योगांचा समावेश होतो मक्तेदारी भांडवलशाहीचा सर्व प्रकारचे खासगी उद्योग हा अर्थ गाडगिळांना निश्चितच अभिप्रेत नव्हता

भारताच्या परिस्थितीचा विचार करताना निदान दोन प्रकारचे खासगी उद्योग आपण वेगळे केले पाहिजेत. अभिजात अर्थशास्त्रीय विवेचनांत ज्या प्रकारचे उद्योग गृहीत धरलेले असतात त्याच्याशीं जुळता असणारा खासगी उद्योगाचा एक प्रकार यात एकूण उद्योग-पतीची सख्या त्याचप्रमाणे प्रत्येक क्षेत्रांतील किंवा प्रत्येक उद्योगातील एकेका स्वतन्त्र कारखान्याची एकूण संख्या तुलनात्मक दृष्टीनें इतकी मोठी असते की, त्यातला कोणताच एक उद्योगपति केवळ आपल्या स्वत च्या कृतीनें, तो उत्पादन करीत असलेल्या वस्तूच्या बाजारपेठेवर किंवा ती वस्तु निर्माण करण्यासाठी त्याला ज्या इतर गोष्टी लागतात त्याच्या बाजारपेठेवर, परिणाम घडवून आणू शकत नाही

शेती आणि इतर प्राथमिक वस्तु उत्पादकांच्या बाबतीत हीच परि-स्थिति असते. याला मळचाचा अपवाद आहे लघुउद्योग, कुटिरोद्योग, व्यापार, वाहतूक, दुकानदारी आणि इतर व्यवसाय या सर्वांना वरील गोष्टच लागू असते.

"खासगी उद्योगाच्या या विस्तृत क्षेत्रात ढवळाढवळ करावी किंवा त्याचा सार्वजनिक क्षेत्रात आतर्भाव करावा असे कोणीहि कधीहि सुचविलें नाही "* (पा ६)

परतु मक्तेदाराची प्रचारक वृत्तपत्रे या क्षेत्रात काम करणाऱ्या लक्षावधि लोकाची मनें कलुषित करून त्यांच्यांत राष्ट्रीयीकरणा-सबधी बागुलबुवाची भीति निर्माण करतात याच कारणामुळे गाड-गिळांनी अत्यत स्पष्टपणें असें म्हटलें आहे की, खासगी उद्योगाचे हें क्षेत्र "सरकारी-समाजवादी उद्योगाचा भाग असणार नाही"

मग राष्ट्रीयीकरणासाठी किंवा सार्वजनिक क्षेत्रात अतर्भूत करून घेण्यासाठी त्याच्या डोळ्यासमोर कोण होते ? ते म्हणतात

---

* पानाचे आकडे डॉ डी आर गाडगीळ याच्या 'भारतातील नियोजन आणि आर्थिक धोरण (Planning and economic policy in India —) या गोखले इन्स्टिटचूट ऑफ इकॉनॉमिक्स (एशिया) या सस्थेने १९६१ साली प्रसिद्ध केलेल्या ग्रथातील आहेत. जाड ठसा माझा स्वत चा आहे – एस् ए. डी

"वाद निर्माण होतो तो फक्त ज्याचें योग्य वर्णन खासगी उद्योग नव्हे तर मक्तेदारी भांडवलशाही असें करतां येईल अशा क्षेत्रांच्या बाबतींत." (पा ७)

"याचे कार्यक्षेत्र एकूण आर्थिक उद्योगाच्या लहानशा परतु अत्यत महत्त्वाच्या विभागापुरतें मर्यादित आहे आजच्या बँका आणि विमा कपन्या, मोठ्या प्रमाणावरील यन्त्रोद्योग, खाणी, मळे, परदेशी व्यापार आणि देशांतर्गत ठोक व्यापार, सट्टे आणि वायदेबाजार हे ते विभाग आहेत " (पा ७)

या मुद्द्यावर भर देऊन ते पुढे म्हणतात

"अर्थव्यवहाराच्या या क्षेत्राच्या बाबतींत खास ध्यानात ठेवण्या-सारखी गोष्ट ही आहे की, व्यवसाय, उद्योग आणि कारखाने यांच्या एकूण सख्येच्या मानाने या क्षेत्रातील घटकाची एकूण सख्या कमी असली तरी देशाच्या आजच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीच्या सदर्भात ते फारच वजनदार आहे." (पान ७)

या विलक्षण परिस्थितीचे वर्णन करताना गाडगिळानी काही प्रत्यक्ष घटनाची उदाहरणें दिली आहेत तीं येथे सागून वेळ घालविण्याचे आपल्याला कारण नाही गाडगिळानी १९५५ साली ज्या घटनाची जत्री दिली त्या आज १९७१ सालीं, मोनॉपली कमिशनचा अहवाल, दत्त चौकशी समितीचा अहवाल आणि त्या समितीला सार्वजनिक वित्तसस्थांनी सादर केलेली निवेदनें प्रसिद्ध झाल्यानतर आपल्या सर्वांच्या फार परिचयाच्या झालेल्या आहेत परतु सोळा वर्षांपूर्वी नियोजन मडळाला ते निवेदन देत असताना ही वस्तुस्थिति नव्हती

याहि वेळेला भारतात आणि भारताबाहेर कम्युनिस्ट, समाजवादी यासारखे राजकीय पक्ष भारतात वाढणाऱ्या मक्तेदारीकडे लक्ष वेध-ण्याचा प्रयत्न करीत होते परतु सत्तारूढ काँग्रेसला बदनाम करू इच्छि-णाऱ्या राजकीय पक्षाचें ते पक्षीय राजकारण आहे असें म्हणून त्या वेळी त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलें गाडगिळासारख्या प्रथितयश अर्थ-शास्त्रज्ञाने हा प्रश्न नियोजन-मडळाच्या कार्यक्रमपत्रिकेवर ठेवल्याने या प्रश्नाला नवा अर्थ आणि नव्या कक्षा प्राप्त झाल्या

या वस्तुस्थितीचें केवळ वर्णन करून गाडगीळ थांबले नाहीत या मक्तेदारी भांडवलरूपी सहस्रपाद राक्षसाच्या वाढीला पोषक ठरतील अशीं धोरणें स्वीकारल्याचा त्यांनी सरकारवर आरोपच केला. "**आधुनिक उद्योगांत ज्या घटकांना मक्तेदार भांडवलदार म्हणून खास स्थान आहे त्यांना आपल्या या स्थानाचा पुरेपूर फायदा उठविण्याची संधि शासकीय धोरणाने जाणूनबुजून उपलब्ध करून दिली.** (पा ९)

या संबंधात सर्वांना माहीत असलेले उदाहरण त्यांनी दिलें; तें आजच्या परिस्थितीलाहि लागू आहे गाडगीळ म्हणतात

"कापड किंवा साखर यासारख्या वस्तूंच्या युद्धोत्तर कालातील किंमतींचा अभ्यास केला तर वरील गोष्टी सहज सिद्ध होण्यासारखी आहे" (पा ९) आणखी पुढे ते म्हणतात, "भारताच्या अर्थव्यवस्थेतील इतर कोणत्याहि क्षेत्रापेक्षा आधुनिक उद्योगक्षेत्राला सर्वांत जास्त संरक्षण आणि साहाय्य देऊन तें सुरक्षित ठेवले जात आहे व त्यासाठी कर भरणाऱ्याच्या व ग्राहकाच्या हिताचा बळी दिला जात आहे" (पा. ९)

या निवेदनात "**सार्वजनिक क्षेत्र हळूहळू वाढवीत नेलें पाहिजे**" अशी मागणी करून गाडगिळांनी आपल्या भूमिकेचें सूतोवाच केले आणि तो प्रश्न तेथेच सोडून दिला त्याबाबत दुसरा एक पर्याय स्वीकारण्यासहि ते तयार होते. तो कोणता ?" "लढाईच्या कालात ब्रिटन आणि अमेरिकेत ज्याप्रमाणे खासगी उद्योगावर नियंत्रण ठेवण्यात आले होते त्याप्रमाणे नियंत्रण ठेवणें" (पा १३)

संक्रमण कालातील तडजोड म्हणून गाडगिळांनी हा पर्याय सुचविला, परंतु त्यामुळे त्यांनी आपली मूळ सूचना मागे घेतली नाही

त्यांचे असें म्हणणें होतें की, "दोन्ही अवस्थांत भांडवलनिर्मितीची क्रिया खासगी व्यक्तीच्या हातांत न राहता सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या हातात राहते त्या अर्थाने हा दुसरा पर्याय काही प्रमाणांत पहिल्याची संक्रमण कालांतील अवस्था आहे असें म्हणता येईल" (पा ९)

परतु ज्याच्या हातीं सरकारचे नेतृत्व होतें आणि जे झपाट्याने प्रगति घडवून आणण्यासाठी "अर्थव्यवस्था युद्धकालाच्या पायावर" उभारण्याची गरज आहे असें ओरडून सागत होते त्यांनीच मक्तेदाराना अधिक सामर्थ्यवान बनविण्यास मदत केली अर्थात् ब्रिटन, अमेरिका ह्या देशात युद्धकालात जीं पावले टाकलीं गेली त्याचेहि इतर परिणाम असेच झाले होते गाडगीळ जेव्हा ब्रिटन-अमेरिकेचा उदाहरण म्हणून उल्लेख करीत होते तेव्हा त्याना मात्र त्या धोरणाचे हे परिणाम अभिप्रेत नव्हते

एक वर्षानतर, १९५६ च्या जानेवारी महिन्यात, गाडगिळानी वडे भाडवलदार, उच्चपदस्थ नोकरशहा आणि मत्री यांचे प्रभुत्व असलेल्या नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलला एक निवेदन सादर केलें त्यात या विषयाकडे पुन्हा वळून त्यानी आपली मतें आणखीनच स्पष्टपणे आणि ठामपणें माडली आहेत आपला जुना मूलभूत सिद्धान्त या ठिकाणी जास्त स्पष्टपणें माडताना ते म्हणतात

"समाजवादी समाजव्यवस्थेकडे जाण्याच्या मार्गावर काही प्रगति करावयाची असेल तर सार्वजनिक क्षेत्र जास्त जास्त विस्तृत होत जाणें ही पूर्व अट आहे विशेषत नियोजनाच्या मार्गाने झपाट्याने प्रगति करू इच्छिणाऱ्या अविकसित विभागाच्या बाबतीत तर ही गोष्ट जास्तच खरी आहे" (पा २८) परतु त्याच्या विचाराची खरी मेख या सिद्धान्तात नाही

सरकारी भाडवलाच्या साहाय्याने नवे धदे काढून सार्वजनिक क्षेत्र वाढविणे आणि सामर्थ्यशाली बनविणें शक्य असतें अर्थात् तें करावेच लागतें परतु या बाबतीत काही विभागातून खासगी व्यक्तीच्या हातांत जे आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण झाले आहे ते नष्ट करूनच पहिलें पाऊल उचलले पाहिजे असें गाडगिळाचें म्हणणें होतें खासगी क्षेत्रांची दोन विभागाची मांडणी पुन्हा एकदा करून गाडगिळानी, जे स्वत च्या निढळाच्या घामाने नव्हे तर "सरकारने त्याना जे अनेक प्रकारें सरक्षण दिलें त्यामुळे 'मोठे झाले आहेत, अशा मक्तेदार भाडवलदाराच्या' ताब्यात असलेल्या विभागाचें राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी पुन्हा केली आहे "देशात आजच हा विभाग

सर्वांत प्रभावशाली बनला आहे आणि त्यात जें प्रचड केंद्रीकरण झालेलें आहे त्यामुळें त्याची अधिकार गाजविण्याची क्षमता आणखीनच वाढते" (पा २९)

म्हणून निव्वळ आर्थिक उपायानी त्यावर मात करता येणार नाही.

"प्राप्तिकर, वारसाकर यांसारख्या केवळ आर्थिक उपायानी हा प्रश्न सुटू शकत नाही आधुनिक उद्योगाचा गेल्या आठ वर्षांत झालेल्या विकासाचा जो प्रत्यक्ष इतिहास आहे त्यावरून वरील गोष्ट पुरेशी सिद्ध झालेली आहे असे मानावयास हरकत नाही" (पा २९).

गाडगिळानी वरील विधान केल्यानतर जी पधरा वर्षे लोटलीं त्यात त्याची सत्यता आणखीनच सिद्ध झाली आहे

"आज आढळणारी शेअर बाजारातील तेजी, यंत्रोत्पादक धद्याना मिळत असलेलें उत्तेजन, अतिशय मोठ्या शहरांतून होत असलेली काही वर्गांची भरभराट आणि दुसरीकडे त्याच्याच बरोबरीने वाढत जाणारी बेकारी, खेडेविभागातून आणि लघु-उद्योगाच्या क्षेत्रातून येणारी मदी आणि एकूण ग्रामीण जनतेची घसरत गेली नसली तरी स्थिर राहिलेली क्रयशक्ति ही सर्व परिस्थिति, योग्य सामाजिक धोरण न ठेवता केवळ उत्पादनवाढीचें उद्दिष्ट पुढे ठेवून भाडवल घालीत राहिलें तर काय होतें यावर झगझगीत प्रकाश टाकणारी आहे" (पा २९) मग गाडगिळाच्या दृष्टीने योग्य सामाजिक धोरण कोणते आणि त्यासाठी प्रारभीचे प्रमुख हत्यार कोणते ?

गाडगिळाना कॉंग्रेस पक्षाने १९५६ साली (किंवा पुन्हा १९६९-७१ साली) नियत्रणाचे जे अनेक अर्धवट उपाय सुचविले किंवा हप्त्या-हप्त्याने राष्ट्रीयीकरण करण्याचा मार्ग सुचविला तो पुरेसा वाटत नव्हता मक्तेदारी भाडवलाचा सपूर्ण नाश हीच त्याची मागणी होती ते म्हणतात

"अखेरीस हा प्रश्न सोडविण्याचा एकच योग्य मार्ग आहे आणि तो म्हणजे, मक्तेदार भांडवलदारानी आज जो भाग व्यापला आहे त्या संपूर्ण विभागाचें सार्वजनिक विभागात रूपातर करणें" (पा २९)

त्यासाठी तावडतोब खाणी, बीज उत्पादन आणि वाटप, भाडवली यंत्रनिर्मितीचे कारखाने, सिमेंट, जडउद्योग, रसायन निर्मितीचे उद्योग इत्यादि क्षेत्रातून जे खासगी उत्पादक घटक आहेत त्याच्या आजच्या सख्येंत वाढ होणार नाही या दृष्टीनें किमान कार्यक्रम आखला पाहिजे

"हीच गोष्ट नकारात्मक पद्धतीनें मांडावयाची तर, उपभोगाच्या वस्तु उत्पादन करणारे कांही उद्योग सोडून वाकी सर्व नवे आधुनिक औद्योगिक कारखाने सार्वजनिक क्षेत्रातच काढावयाचे धोरण अशी व्याख्या करता येईल मार्केटिंग बोर्डें स्थापन करणे इत्यादि मार्गांनी **सर्व महत्वाच्या आणि मूलभूत वस्तूंचा** आयात-निर्यात व्यापार **सार्व-जनिक क्षेत्रांत आणावा लागेल**" (पा २९)

१९५६ च्या जानेवारी महिन्यात श्री सी डी देशमुख वित्तमंत्री असताना श्री गाडगीळ आणि श्री व्ही के आर् व्ही राव यानी (या विषयावर दोघांची चर्चा झाली होती) त्यांना एक निवेदन देऊन त्यांत कोणता उद्योग आणि कोणता व्यापार सार्वजनिक क्षेत्रात घ्यावा या-सबधी तपशीलवार सूचना केल्या होत्या त्याबाबत गाडगिळांनी वेळो-वेळी जीं निवेदने दिली त्याची येथे पुनरुक्ति करण्याचें कारण नाही

दुसरी पचवार्षिक योजना तयार झाल्यानतर ती अनेक मार्गांनी उधळून लावण्याचे बुद्धिपुरस्सर प्रयत्न मक्तेदार भाडवलदारानी सुरू केले जड उद्योग, सार्वजनिक क्षेत्रांत सुरू करण्यासाठी मोठ्या प्रमाणा-वर मदत देण्यास परकीय साम्राज्यवादी राष्ट्रातील भांडवलदारांनी नकार दिला त्या कालांत, श्री अशोक मेहतानी त्याचें वर्णन भारतीय भाडवल 'सपावर गेलें आहे' असे केलें होतें अर्थात् या वेळेपर्यंत मेहतांनी मक्तेदारीच्या गोटात प्रवेश केला नव्हता

अशा परिस्थितीत सार्वजनिक क्षेत्रासाठी आणि सरकारी खर्चा-साठी चालू भाडवलाचा ओघ सतत चालू ठेवता यावा म्हणून विमा-धद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यात आलें मोठ्या प्रमाणावर तुटीच्या अर्थपुरवठ्याच्या मार्गाचा अवलब करण्यात आला जड उद्योगासाठी लागणारी यत्रसामग्री पुरविण्यावावत समाजवादी देशाना विचारणा करण्यात आली परतु **क्रांतिकारक गोष्टी करण्याचा धसका घेतला**

असलेल्या भारत सरकारने श्री गाडगीळ आणि अर्थशास्त्रज्ञ समितीतील इतर कांही प्रगतिशील अर्थशास्त्रज्ञानी आवर्जून सांगितलें असताहि मक्तेदारांच्या बालेकिल्ल्याचें राष्ट्रीयीकरण करण्यास नकार दिला प्रत्यक्षांत गाडगिळानी भविष्य केल्याप्रमाणे योजनेच्या आधाराने मक्तेदारी भांडवलाच्या केंद्रीकरणात प्रचंड प्रमाणात वाढच झाली आहे असें कपनी लॉ कायद्यावरील अहवालावरून उघड झालें

- ३ -

मक्तेदारी भांडवलशाहीच्या वर उल्लेख केलेल्या बाजूचें आपण जास्त निरीक्षण केले पाहिजे

प्रचंड भांडवली खर्च, प्रचंड अपेक्षा आणि प्रचंड गाजावाजा केलेली दुसरी पचवर्षीय योजना शेवटी एकदा मजूर झाली. परतु ही योजना परिणामकारकरीत्या कार्यवाहीत आणतील अशा सस्था अस्तित्वात नव्हत्या, त्यांत जनतेला सामील करून घेतलें नव्हतें, योजनेच्या कार्यवाहीची तपासणी करण्याची सोय नव्हती, लोकशाही पद्धतीने टीका करण्यास अगर विचारविनिमय करण्यासहि जागा नव्हती या सर्वांचा परिणाम गाडगीळ म्हणत होते तसाच झाला मक्तेदार आणि त्याच्या पाठिराख्यानी, सत्ताधारी पक्षात आणि सरकारी यत्रणेत, विशेषत नोकरशाहीतील वरिष्ठ जागांवरून असलेल्या आपल्या पित्त्यांच्या साहाय्याने, एकदर समाजाच्या जिवावर आपले खिसे भरून घेतले याचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेच्या सर्व शाखाना भोगावे लागले परिणामी ही महत्त्वाकांक्षी योजना कोलमडली आणि १९५८ सालीच तिच्या 'फेर-विचाराची' भाषा सुरू झाली म्हणून १९५८ च्या जानेवारी महिन्यात गाडगिळानी भारत सरकारला या विषयावर एक प्रदीर्घ निवेदन सादर केलें

आपले स्वत चे आणि आपल्या वर्गाचें हित साधण्यासाठी ज्यानी पचवार्षिक योजनेचा दुरुपयोग करून ही आपत्ति ओढवून घेतली होती,

ज्यांनी वस्तूच्या किमतींत भरमसाठ वाढ घडवून आणली, परकीय चलनाची, धान्याची आणि कच्च्या मालाची चणचण निर्माण केली, तेच आता या सर्वांचें खापर पचवार्षिक योजनेच्या प्रचड आकारावर फोडू लागले आणि हा ' साहसी ' प्रयोग बद करावा अशी मागणी जरी त्यानी केली नाही तरी योजना लहान असावी अशी मागणी मात्र त्यांनी जोरदारपणें माडण्यास सुरुवात केली ही योजना फसली असल्याने ती रद्द करावी असें त्यांचें म्हणणे होतें

यावर गाडगिळांची प्रतिक्रिया काय होती ? योजना किती पूर्ण झाली याचा आढावा घेऊन ती पूर्णपणे फसली आहे या तिच्यावरील टीकेचा परामर्ष घेताना ते आपल्या नेहमीच्या खोचक शैलींत लिहि- तात "उदाहरणार्थ असे दिसतें कीं, **योजना मोठ्या खाजगी उद्यो- गाच्या क्षेत्रात अपेक्षेपेक्षा जास्तच पूर्ण झाली आहे.** आयात व्यापाराचे परवाने देण्याबाबतच्या धोरणाचाच हा मुख्यत परिणाम आहे " (पा ७७–७८) याचा परिणाम म्हणून इतर क्षेत्रांना धोका पोचला

या सबधात, या कालातील आर्थिक धोरणाच्या इतिहासात जी एक घटना घडली तिचा उल्लेख करणे आवश्यक आहे दुसरी पचवार्षिक योजना मजूर झाल्यानतर उद्योगाच्या विकासासाठी लागणारें फार मोठें परकीय चलन उपलब्ध व्हावें यासाठी योजनेच्या चौकटीतच व्यवस्था केलेली होती या परकीय चलनाची, मक्तेदारानी, अर्थ मत्रालयांतील नोकरशहा आणि मोठमोठ्या बँका याच्या साहाय्याने, फार मोठ्या प्रमाणावर, गुपचुपपणे चक्क ' चोरी ' केलेली होती या चोरीचे प्रमाण इतके प्रचड होतें की, जेव्हा सार्वजनिक क्षेत्रातील उद्यो- गानी परकीय चलनाची मागणी केली तेव्हा अर्थखात्याजवळ परकीय चलन शिल्लकच नव्हतें मोठमोठ्या मक्तेदार घराण्यांना दिलेल्या परवान्याच्या पोटी तें सपून गेलें होतें हे सर्व घडवून आणण्यात बँका आणि नोकरशहा याचा हात होता १९५७ सालात प्रातिक सरकारांना पैशाची जी चणचण भासली आणि सरकारी कर्जरोख्यांत पैसे गुत- विण्यात बँकानी जी असमर्थता दर्शविली, त्याचें कारण मुद्धा १९५६- ५७ सालात बँकानी मोठमोठ्या खासगी उद्योगपतींना दिलेल्या

कर्जांत प्रचंड प्रमाणांत वाढ केली होती हें होतें. यावरून असें दिसतें की, १९५६-५७ सालांत बँकांनी द्यावयाच्या कर्जाची मर्यादा जी वाढवून देण्यात आली, तिचा संबंध या कालांत फार मोठ्या प्रमाणावर केल्या गेलेल्या भांडवली वस्तूंच्या आयातीशीं होता, तिच्यामुळे जी रक्कम सामान्यत सार्वजनिक क्षेत्रासाठी उपलब्ध झाली असती तिचा ओघ इतरत्र वळविला गेला " (पा ७८)

असे दिसते की, इतर मार्गांनी मुद्धा उपलब्ध आर्थिक साधनांचा ओघ खास करून मोठ्या खासगी उद्योग विभागाकडेच वळविला जात आहे सरकारने निर्माण केलेल्या वित्त-संस्थांचे कार्यहि याच दृष्टीने चालल्यासारखें वाटतें " (पा ७८)

आणि याचे परिणाम काय ?

परकीय मदतीवर अवलंबून राहणे आणि परकीय भांडवल केव्हा येतें याकडे डोळे लावून बसणें याचा परिणाम मोठमोठ्या निम-मक्तेदारी खासगी उद्योगांची ताकद वाढणें हाच होण्याची शक्यता आहे (पान ७९)

यावर उपाय काय ? गाडगिळांनी पुन्हा एकदा ' सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार वाढवावा आणि सर्व सरकारी वित्त-संस्था आणि हमी घेणाऱ्या संस्था यांचे धोरण पद्धतशीरपणें, मोठ्या केंद्रित उद्योगाऐवजी, लहान विखुरलेल्या उद्योगांना साहाय्य करण्याचे असावे, ' (पा ७९) अशी मागणी केली

निंदाव्यंजक सुरात गाडगीळ लिहितात

परंतु गेल्या अडीच वर्षांत या दुसऱ्या मार्गाने उल्लेखनीय असे कांहीहि केलेलें आढळत नाही उलट सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार वाढविण्याची भाषासुद्धा काढावयाची नाही याबाबत सर्वांचे अलिखित एकमत झालें असावें असाच भास होतो. " (पा. ७९)

भारतांतील अप्रामाणिक मक्तेदार, भांडवलदार आणि त्यांचे राजकीय बौद्धिक आणि नोकरशाही वर्तुळातील तथाकथित तत्त्वज्ञ या सर्वांनी परकीय मदतीशिवाय एक पाऊलहि पुढे टाकतां येणार नाही ' असा प्रचार चालविला होता त्याला उद्देशून गाडगीळ म्हणतात

" शिवाय कराच्या बाबतीत खास सवलती देणें यासारख्या मार्गानें परकीय भाडवलाच्या आयातीसाठी सुकर परिस्थिति निर्माण करावी अशीहि विचारसरणी आज आहे जी परकीय मदत मिळविण्यात सरकार असमर्थ ठरलें ती आम्ही मिळवू शकू हा भारतांतील खासगी भाडवलदाराचा दावाहि या बाबतीत फार महत्त्वाचा आहे यावरून परकीय उद्योगाच्या क्षेत्राला मिळणाऱ्या सवलती अगदी सहजपणें भारतीय उद्योग-विभागाकडे वर्ग केल्या जातील हें उघड आहे " (पा ७९)

औद्योगिक विकास वेगाने घडवून आणावयाच्या नावाखाली जनतेवर कर लादून जमा केलेल्या व सरकारनेच सार्वजनिक पैशातून पुरविलेल्या आर्थिक मदतीच्या जोरावर मोठे उद्योग आणि मक्तेदारी भाडवलशाही याचा विकास होतो हें खरें परतु या मक्तेदारी भाडवलाचे जनतेशी, कामगार वर्गाशी आणि राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेशीं कसे सबध असतात ?

गोखले इन्स्टिटयूटमध्ये १९५५ च्या एप्रिल महिन्यांत गाडगिळाच्या मार्गदर्शनाखाली 'अर्थशास्त्रज्ञांच्या समितीला सादर करण्यासाठी एक प्रबध तयार करण्यांत आला त्यात भारतातील उद्योग-उभारणीची जी आजची चौकट आहे तिचे सामाजिक, आर्थिक निष्कर्ष काय निघतात याचा ऊहापोह केलेला आहे

" हें स्पष्टपणे सागण्यात आलें की, सरकारी मदतीवर वाढणाऱ्या खासगी उद्योगाना, सार्वजनिक हिताचा आशय प्राप्त करून देण्यासाठी जोंपर्यंत खास प्रयत्न केले जात नाहीत आणि जोपर्यंत भाडवलनिर्मितीचें एकमेव साधन याच दृष्टीने, मोठमोठ्या खासगी उद्योगाकडे बघितलें जाते तोपर्यंत या उद्योगाचे भाडवल आणि सरकारवर दडपण आणण्याची त्याची ताकद वाढणे अपरिहार्य आहे " (पा ७९)

कापड गिरण्या मोठ्या प्रमाणावर बद पडण्याची क्रिया त्याच वेळी सुरु झाली होती अजूनहि ती चालूच आहे व ही लाट जड इजिनिअरिंग सारख्या पायाभूत उद्योगांतून पसरत आहे तिचें उदाहरण देऊन गाडगीळ म्हणतात

'कापड गिरण्या बद पडल्याने निर्माण होणाऱ्या बेकारीवर उपाय योजण्याच्या बाबतीत सरकार असमर्थ असल्यासारखे वाटतें मिश्र अर्थव्यवस्थेंत विकास योजना कार्यवाहीत आणतांना महत्वाचे निर्णय घेण्याच्या बाबतीत सरकारला जो पेच पडतो त्याचेंच हे तीव्र स्वरुप आहे खासगी क्षेत्रातील अकार्यक्षम आणि उद्दाम कारखानदाराच्या विरुद्ध कडक उपाय योजण्याचें धाडस जर सरकार करणार नसेल तर मिश्र अर्थव्यवस्था प्रत्यक्षात आणण्यासाठी फार मोठी सामाजिक किंमत द्यावी लागणें अपरिहार्य आहे " (पा ७९)

हे लिहिल्यानतरच्या कालांत मोठमोठ्या खासगी उद्योगांना आणि विशेषत मोठ्या मक्तेदार घराण्याना दिल्या जाणाऱ्या साहाय्यात प्रचड प्रमाणात वाढच झाली आहे राष्ट्रीयीकरण झालेला विमा-व्यवसाय, युनिट ट्रस्ट, फायनान्स कॉर्पोरेशन, आय् सी आय् सी यासारख्या सरकारकडून मदत मिळणाऱ्या भारतीय वित्तसस्थानी त्याचप्रमाणे परकीय सस्थानी मोठ्या उद्योगाना दिलेल्या कर्जांत आणि भाग-खरेदीच्या स्वरूपात केलेल्या साहाय्यांत बरीच मोठी वाढ केली आहे बँका आणि सर्वसाधारण विमाव्यवसायाचें राष्ट्रीयीकरण, सार्वजनिक क्षेत्रात काही जड धदे सुरू करणे, धान्याचा व्यापार सरकारने ताब्यात घेणें, इत्यादि गोष्टी करून मक्तेदारी नष्ट करण्याच्या, त्याचप्रमाणे महत्वाचे मूलभूत उद्योग सार्वजनिक क्षेत्रात सुरू करून त्यांच्यामार्फत उत्पादनावर, किमतीवर आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या औद्योगिक आणि शेती विभागांना लागणाऱ्या वस्तूवर नियत्रण बसविण्याच्या मार्गावर आपण बरीच प्रगति केली आहे असे वाटण्याची शक्यता आहे परतु असें मूल्यमापन गैरसमज निर्माण करणारे आणि अशास्त्रीय आहे

१९५६ सालीं नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलला सादर केलेल्या निवेदनात गाडगिळानी, ' ज्या खासगी उद्योगाना सरकारी मदत दिली जाते त्या सर्व उद्योगांना ताबडतोब सार्वजनिक हिताचे ठरवून त्याना वाढत्या प्रमाणात सार्वजनिक क्षेत्रात सामावून घेण्याच्या प्रश्नाबाबत "

७९१६३ २१९२ शि-वं ५ २५ २५।८५

(पा २३) तावडतोब आणि स्पष्ट निर्णय घेण्यात यावेत अशी मागणी केलेली होती

आज, १९७१ साली म्हणजे वरील मागणीनंतर पंधरा वर्षांनी, भारत सरकारची या बाबतची भूमिका डळमळीत असल्याचेंच आपल्याला आढळून येतें मक्तेदारी उद्योगाना सरकारने दिलेल्या कर्जाचें भाग-भाडवलात रूपातर करून त्या भाग-भाडवलाच्या जोरावर त्या उद्योगाच्या व्यवस्थापनात भागिदारी निर्माण करावी, म्हणजेच त्याना 'सार्वजनिक हिताचें' बनवावें, ही सूचना व्यवहारात आणण्यास सरकार नकारच देत आहे आणि यासाठी सरकार कारण काय देतें ? तर म्हणे मक्तेदार भाडवलदार, या धोरणाचा 'मागील दाराने केलेलें राष्ट्रीयीकरण' म्हणून धिक्कार करतात !

बँकाच्या राष्ट्रीयीकरणाचें असेंच आहे या निर्णयाचे जरी आपण स्वागत करीत असलों तरी या राष्ट्रीकृत वित्त-साधनाचा उपयोग आजहि मक्तेदारी हितसबधी व्यक्ति, बाजारची कोंडी करण्यासाठी आणि लहान शेतकऱ्याला त्याने उत्पादन केलेल्या मूल्याचा न्याय्य वाटा न देतां, ग्राहकांच्या हितसबधानाहि विघातक अशी किंमतवाढ करण्यासाठी करून घेत आहेत ही वस्तुस्थिति आपण दृष्टीआड करू शकत नाही रिझर्व्ह बँक 'गुणात्मक पत नियंत्रणाच्या'* धोरणाचा अवलब, सुगीच्या काळात धान्य आणि इतर कच्चा माल याच्या खरेदीत होणारी सट्टेबाजी स्वरूपाची गुंतवणूक रोखून धरण्यासाठी करील अशी अपेक्षा असते परतु या धोरणाचा अवलब करून सट्टेबाजीमुळे होणारी किंमतवाढ आणि जनतेच्या मर्यादित क्रयशक्तीची लुबाडणूक थांबविण्यात सतत अपयशच आल्याचें आढळून येते सरकार-नियंत्रित वित्तसस्था अजूनहि मक्तेदार व्यापाऱ्यांना प्रचड नफे मिळवून देण्यास साह्याय्यभूतच होत आहेत

१९५९ च्या ऑगस्ट महिन्यात 'तिसऱ्या पचवार्षिक योजनेपाठीमागील भूमिका' या नियोजन-मडळाला सादर केलेल्या निवेदनांत या यंत्रणेसबधी गाडगीळ म्हणतात

---

* Selective credit control

"या (गुणात्मक पत-नियंत्रणाच्या) धोरणामुळे कांही विशिष्ट वस्तूंच्या किमतींची वाढ रोखण्यात यश मिळालें आहे असा दावा केला जातो या धोरणाचा असा परिणाम झाला असल्याबद्दल शंका आहे शिवाय रिझर्व्ह बँकेने काढलेल्या आदेशांतून निसटण्यासाठी जरूर वाटल्यास बँका आणि त्याचे ग्राहक विशिष्ट कारणासाठी घेतलेलीं कर्जें सर्वसाधारण तारणाच्या खात्याकडे, किंवा 'स्वच्छ' (clean) खात्याकडे वर्ग करतात ही सर्वांना माहीत असलेली गोष्ट आहे याच संबंधात १९५८–१९५९ सालच्या सुगीच्या काळात 'स्वच्छ' पत आणि प्रत्यक्ष वस्तूचा विशेषत शेती-उत्पादित वस्तूंचें तारण ज्याला नाही अशी पत याच्यात जी उघड वाढ झाली तिच्यावर टीका झालेली आहे तेव्हा वस्तूंच्या किमती रोखण्यांत केवळ 'गुणात्मक पत नियंत्रणाचे' धोरण विशेष परिणामकारक होणें संभवनीय वाटत नाही" (पा १३८)

बँकांचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतरहि या परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही आज १९७१ साली बँकांचें जेवढें राष्ट्रीयीकरण झालेले आहे तेवढेंच राष्ट्रीयीकरण गाडगीळ लिहीत होते त्या काळांत १९५९ सालीं रिझर्व्ह बँकेचेंहि झालेलें असताना ती या 'गुणात्मक पत नियंत्रणाच्या' धोरणाचा वापर करीत होती यावरून प्रस्थापित मक्तेदारीचा प्रभाव निपटून काढण्यास केवळ राष्ट्रीयीकरण पुरे पडत नाही हेंच सिद्ध होते

१९७० साली पीक भरपूर येऊनहि आणि रिझर्व्ह बँक 'गुणात्मक पत नियंत्रण' करीत असतानाहि जेव्हा शेंगदाणा, कापूस आणि इतर शेती-उत्पादित मालाच्या किमती एकदम आणि भरमसाठ वाढल्या त्या वेळी तो प्रश्न मीं लोकसभेत निर्माण केला होता परंतु माझ्या प्रश्नाला सरकारजवळ उत्तर नव्हते आणि असतें तरी तें देणें त्यांना शक्य नव्हतें कारण छोटचा उद्योगांना आणि लहान जमीनधारकांना कर्ज दिल्याचा कितीहि देखावा निर्माण केला जात असला तरी राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी बँकांचा उपयोग, मक्तेदारी भांडवल आपल्याला उद्योगधंदे आणि व्यापार याच्यातील मक्तेदार सुलभ व्हावा म्हणून

जितका करून घेत असे तितकाच आज राष्ट्रीयीकरण झाल्यानतरहि करून घेत आहे

म्हणून खासगी उद्योगातील सर्व मक्तेदारी विभाग सपूर्णतया सार्वजनिक उद्योग विभागात सामील करण्याबद्दल गाडगिळांनी धर-लेला आग्रह योग्यच होता परतु अजूनहि त्याचे हें उद्दिष्ट सफल झालेले नाही

असो आता नियोजनक्षेत्रासबधी अपुरें राहिलेले कथाकथन आपण पुढे सुरू करू मक्तेदारी भांडवलाला असलेल्या गाडगिळाच्या विरो-धाची प्रखरता कधीच कमी झाली नाही पुढच्या काळात सरकार जेव्हा अडचणीत आलें आणि अवाढव्य असलेल्या दुसऱ्या पचवार्षिक योजनेची 'पुनर्रचना' सुरू झाली तेव्हा गाडगिळानी केलेलें विश्लेषण बरोबर होतें हें पुन्हा एकदा सिद्ध झालें नतरच्या तिसऱ्या पचवार्षिक योजनेच्या बाबतीत असेंच घडलें तिसरी पचवार्षिक योजना जवळ जवळ सोडून देण्यात आली आणि मक्तेदार भांडवलदार मागणी करीत असलेल्या 'नियोजनाच्या सुट्टीला' प्रारभ झाला

तिसरी पचवार्षिक योजना आखण्याची तयारी सुरू झाली तेव्हाहि गाडगिळानी सरकारी नेतृत्वावरील आपली टीका चालूच ठेविली. कारण हें सरकार योग्य धोरण आखण्यात किंवा योजनाबद्ध विकासाला आवश्यक असणारी यत्रणा उभारण्यात अयशस्वी झालें होतें १९५९ च्या ऑगस्ट महिन्यात गाडगिळानी आपलें 'तिसऱ्या पचवार्षिक योजनेच्या आखणीसबधी' निवेदन सादर केले या निवेदनात ते चिडून लिहितात, "कोणी कितीहि सागितलें तरी माझें असे स्पष्ट मत आहे की, ज्याला नियोजन म्हणतात तें आजच्या भारतात अस्ति-त्वात नाही जें आहे त्यात फक्त सार्वजनिक क्षेत्रात करावयाच्या खर्चाचे किंवा खासगी अगर सहकारी क्षेत्राला करावयाच्या मदतीचे आकडे आहेत आणि जेथे सरकारी धोरणाची अंमलबजावणी होते तेथें ते व्यापाऱ्याच्या आणि संघटित बड्या उद्योगांच्या हिताचेंच असल्याने एकूण परिणामाची तीव्रता वाढतेच. (पा १४०)

१९६७ सालीं राजकारणात बदल झाल्यानतर गाडगिळाना नियोजन-मडळाचें उपाध्यक्षपद स्वीकारण्याची विनती करण्यात आली, तेव्हा तिसऱ्या पचवार्षिक योजनेचा सपूर्णपणें बोजवारा उडालेला होता आणि चौथी पचवर्षीय योजना कोठें दृष्टिपथातहि नव्हती त्या वेळी त्यानी आपलें धोरण जरा नरम ठवावें किंवा बदलावें, वडचा उद्योगपतीच्याबरोबर सहकार्य करावें, थोडचा फार 'मुक्त' धोरणाचा अवलब करावा, दृष्टि जरा जमिनीवर ठेवावी, नियोजन कमी महत्त्वाकाक्षी असावें आणि मुख्य म्हणजे सर्वकष कडक नियोजनाची कल्पना सोडून द्यावी असा उपदेश गाडगिळाना करण्यात आला परतु त्यानी माघार घेण्यास नकार दिला

नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलला सादर केलेल्या 'चौथ्या योजनेबाबत सर्वंकष दृष्टिकोण' या आपल्या निवेदनात गाडगीळ म्हणतात "आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण आणि खासगी उद्योगाच्या क्षेत्रात काही कारखानदाराना असलेलें मक्तेदारीचें स्थान ही दुसरी बाजू आहे आणि तिच्याकडे लक्ष पुरविणें आवश्यक आहे" यावर योजावयाच्या उपायाची रूपरेषा देताना गाडगीळ म्हणतात "उपलब्ध वित्त भाडवलाचा अकारण मोठा ओघ मोठचा उद्योगपतीच्याकडे वळू नये म्हणून सरकारने वित्त-सस्थाची पत-विषयक धोरणें बदलण्याच्या दृष्टीने धोरणें आखावीत ज्या सार्वजनिक वित्त-सस्थानी खासगी धद्यांतून भागखरेदीच्या स्वरूपांत भाडवल गुतविलें असेल त्यानी त्या धद्याच्या व्यवस्थापनात भाग घेण्याचा आपला हक्क बजावला पाहिजे असें त्यांचें मत होतें मॅनेजिंग एजन्सी पद्धत रद्द करावी म्हणून ज्या सूचना येत होत्या त्याना उद्देशून गाडगीळ त्याच्या सुपरिचित पद्धतीनें म्हणतात, ही पद्धत प्रत्यक्षांत रद्द होईल, तेव्हा तो केवळ नावाचा बदल असणार नाही याबद्दल काळजी घेतली पाहिजे"

त्या वेळीं वृत्तपत्रातील बातमी अशी होती की, नियोजन-मडळाच्या नव्या उपाध्यक्षांनी हें जे निवेदन सादर केलें त्याचें नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या बैठकींत अत्यत थडें स्वागत झालें आणि तें साहजिकच

होतें तेव्हापासून त्यांना पदभ्रष्ट करण्याच्या कारवाया सुरू झाल्या व त्या यशस्वी झाल्या गाडगिळांशी अखेरपर्यंत लढा देण्याचा निर्णय मक्तेदारी भांडवलानें घेतला होता आणि शब्दशः त्यांच्या अखेरीपर्यंत मक्तेदारी भांडवलानें हा लढा चालू ठेवला

- ४ -

आतापर्यंत आपण गाडगिळांच्या अर्थशास्त्रीय विचाराची एकच, मक्तेदारी भांडवलशाहीसबंधीची बाजू पाहिली खरें म्हणजे, ज्या अविकसित देशांत भांडवलीपद्धतीची अर्थव्यवस्था आधीच प्रस्थापित झालेली आहे, एवढेंच नव्हे तर मक्तेदारी भांडवलशाहीची यत्रणाहि अस्तित्वात आलेली आहे अशा देशांच्या विकासासबंधी गाडगिळांची स्वतःची अशी सम्यग् विचारपद्धति होती ज्या विचारवंताला देश प्रगतीच्या मार्गावर पुढे न्यावयाचा असेल आणि तोहि 'योजनाबद्ध विकासा'च्या पायावर पुढे न्यावयाचा असेल त्याने सर्वंकष, एकत्रित अशी विचारसरणी पुढे ठेवावीच लागते त्याला अर्थशास्त्राची एकच बाजू असून भागत नाही तर त्याला सामाजिक, राजकीय आणि तत्त्वज्ञानाचीहि बाजू असावी लागते गाडगिळांनी स्वतःला नियोजित अर्थव्यवस्थेच्या क्षेत्राची मर्यादा घालून घेतली असली तरी तीहि त्यांनी एका सम्यग् विचारसरणीच्या चौकटीत बसविली होती याला ते समाजवादी विचारपद्धति म्हणत आणि अर्थव्यवस्थेचे त्यांनी जे नियोजन सुचविलें होते त्याचे वर्णन ते सामान्यतः 'समाजवादी समाजासाठी' नियोजन असें करीत

गाडगिळांनी मक्तेदारी भांडवलावर जो हल्ला चढविला आणि सार्वजनिक क्षेत्राच्या उभारणीवर भर दिला त्याचे भविष्यात काही परिणाम होणार असले तरी, तो ताबडतोबीच्या समाजवादी समाज-निर्मितीचा एक भाग आहे असे त्यांनी कधी मानलें नाही हें ध्यानात ठेवणें अत्यंत आवश्यक आहे

ज्या मक्तेदारी भाडवलशाहीविरुद्ध गाडगीळ लढत होते ती पुढार-लेल्या भाडवलशाही देशातील नव्हे तर एका मागासलेल्या किंवा विकसनशील भांडवलशाहीतील मक्तेदारी होती या भाडवली व्यवस्थेत भाडवली उत्पादनसबधाबरोबरच इतरहि उत्पादनसबध अस्तित्वांत होते सरजामशाही आणि सरजामशाही सत्तेखालून नुकत्याच सुटलेल्या देशात अशी परिस्थिति असणे अपरिहार्य असतें हा मुद्दा स्पष्ट करताना गाडगीळ म्हणतात

"भारतात वाढत्या सपन्नतेचें वाटप, मूठभर आणि तुलनात्मक दृष्टचा बदिस्त गटातच होतें आणि मक्तेदार भाडवलदाराच्या सामर्थ्या-मुळे परिस्थिति जास्तच विकट होते म्हणून खासगी उद्योगाचा जो विभाग आज मक्तेदार भाडवलदारांनी व्यापला आहे तो वाढत्या प्रमाणात सार्वजनिक क्षेत्रात आणणे ही गोष्ट समाजवादी समाज-रचनेच्या उभारणीची एक गरज म्हणून जरी बाजूला ठेवली तरी एरवीहि फार निकडीची आहे असें वाटू लागते, आणि समाजवादी ध्येयाची घोपणा केल्यानतर तर ती अत्यत महत्त्वाची आणि अपरिहार्य बनते ' (पा २९)

तेव्हा गाडगिळाच्या मतें मक्तेदारी भांडवलशाही संपुष्टांत आणणे हे खास समाजवादी मार्गावरील पाऊल आहेच असे नाही लोकशाही, समानता आणि मानवता याच्या सामान्य विकासासाठी सुद्धा अशी एक समाजव्यवस्था प्रस्थापित करावी लागते, ज्यात खासगी विभाग कायम ठेवला गेला आणि दुसरा एक भाग थोडाफार फेरफार केलेल्या किंवा नियंत्रित भांडवली सबधावर आधारलेला असला तरी त्यांतहि मक्तेदारी भांडवलशाही नष्ट करावीच लागते ही जी मक्तेदारी-विरोधी दृष्टि आहे ती त्याच्या मतें समाजवादीच असते असें नाही. ती काय असते ? ती जोरदार बिगर भाडवलशाहीचे आणि समाज-वादाचें वळकट तणाव असलेली 'क्रांतिकारक लोकशाही' असू शकते एकूण अर्थव्यवस्थेच्या ज्या उर्वरित विभागातून मक्तेदारीची हकालपट्टी झालेली असत तेथेहि भांडवलदारी उत्पादनसबध कायम राहिलेले असतात आणि म्हणून तिला समाजवादी किंवा बिगर भाडवलदारी

म्हणणें योग्य होणार नाही तिला समाजवादाचा रस्ता शोधण्यासाठी धडपडणारी बिगर मक्तेदारी भांडवलशाही किंवा सहकारी आणि लोकशाही अर्थव्यवस्था असें म्हणता येईल

म्हणून गाडगीळ आपल्या अर्थव्यवस्थेला 'समिश्र अर्थव्यवस्था' असें म्हणतात या शब्दाचा त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ आणि भाडवलदारांच्या भाटानी त्याचा लावलेला अर्थ यात फार फरक आहे गाडगिळाना अभिप्रेत असलेल्या 'समिश्र अर्थव्यवस्थेत मक्तेदारी भाडवलशाहीला स्थान नव्हतें. उलट ही अर्थव्यवस्था मोक्याच्या ठिकाणी असणाऱ्या प्रचड सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाच्या आणि व्यापाराच्या पायावर विकास पावतें, अजूनहि तिच्यात उद्योग आणि व्यापार याचा एक खासगी विभाग कायम असतो, परतु त्याच्याच बरोबरीनें एक सहकारी विभागहि उभारला जात असतो तिची शेतीची अर्थव्यवस्था श्रीमत, मध्यम आणि गरीब शेतकरी व शेत-मजूर याची बनलेली असते, परतु उरलेल्या विभागात झपाट्याने वाढणाऱ्या सहकारी क्षेत्राकडून मोठ्या कुलक शेतकऱ्याच्या प्रचड ताकदी-वर क्रमश मात केली जाते त्यात उत्पन्नात फारशी विषमता नसलेला बुद्धिजीवि वर्ग काम करून जगत असतो त्यांतील कामगार वर्गाला मूलभूत हक्काची, वेतनाची आणि जीवनपरिस्थितीची हमी मिळा-लेली असते आणि तिच्या लोकशाही शासनसस्थेचें नियत्रण सामाजिक क्रांतिकारक पक्ष करीत असतो असा समाज उद्रेक आणि आर्थिक अरिष्टे याशिवाय जगू शकतो आणि समाजवादाकडे प्रगति करू शकतो

भविष्यकालीन भारतीय समाजासाठी करावयाच्या नियोजनाच्या प्रश्नावर गाडगिळांनी जे लिखाण केलें आणि जी निवेदनें लिहिलीं त्यात त्याना अभिप्रेत असलेली अर्थव्यवस्था आणि राज्यपद्धति याचें सकलित विवेचन पाहावयास मिळतें.

मक्तेदारी आणि जमीनदारशाही, परकीय दडपण आणि दुसऱ्याच्या श्रमावर जगणे नष्ट झालें आणि वरील उद्दिष्टासाठी लढा दिल्या-नतर ती उद्दिष्टें सफल झालीं तर गाडगिळाच्या दृष्टीनें कोणती क्रांति

पूर्ण होणार होती ? या प्रश्नाचें उत्तर हेंच द्यावे लागेल की, गाडगीळ 'क्रांतिकारक लोकशाहीवादी' होते आणि त्या दृष्टीने त्यानी समाजवादाकडे जाणारी 'क्रांतिकारी लोकशाही समाजव्यवस्था' अस्तित्वात आणण्यासाठी कराव्या लागणाऱ्या 'राष्ट्रीय लोकशाही क्रांतीची' आर्थिक, राजकीय आणि सैद्धान्तिक भूमिका या ठिकाणी मांडली आहे म्हणून त्यानी त्याच्या दर्जाच्या आणि कीर्तीच्या इतर अर्थशास्त्रज्ञापेक्षा अगदी वेगळी, मक्तेदारीला कडवा विरोध करण्याची भूमिका, हाच आपला प्रारंभबिंदु केला

गाडगिळांना अभिप्रेत असलेल्या 'समिश्र अर्थव्यवस्थेचा' विचार तिचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतर अंगावर आणि जनतेंतील इतर वर्गांवर काय परिणाम होतो हें ध्यानात घेऊनच केला पाहिजे याचा थोडासा विचार आपण गाडगिळानी वेळोवेळी नियोजन-मंडळाला जी निवेदनें सादर केलीं त्याच्या आधारें करणार आहोंत

उत्पादन, अभिसरण आणि विनिमय यांमधील खासगी क्षेत्रांतील मक्तेदारी भांडवलशाही भागाचें पूर्णपणें राष्ट्रीयीकरण करून तो सार्वजनिक क्षेत्रात विलीन करून टाकल्यानंतर मक्तेदारी भांडवलशाहीला अटळपणे चिकटून असणाऱ्या, तिची उपनिर्मिति असणाऱ्या आणि सामाजिक विकासाची नैसर्गिक दिशा बदलून टाकणाऱ्या गोष्टी क्रमश नष्ट होऊ लागतात नवी बिगर मक्तेदारी लोकशाही समाजरचना प्रस्थापित झाल्यानंतर तिच्या पाठोपाठ होणाऱ्या सामाजिक आर्थिक बदलाचा विचार जेव्हा आपण करू तेव्हाच याचाहि विचार करू

मक्तेदारीचा बीमोड करणे म्हणजे वाच्यार्थानें नव्हे तर लक्षार्थानें मगरमिठींतून सुटका करून घेण्यासारखें आहे हा बीमोड झाल्याबरोबर राज्ययंत्र आणि त्याचा पाया असलेली अर्थव्यवस्था यात प्रचंड मूलभूत बदल होतात

मक्तेदारी भांडवलाची सत्ता असलेले अत्यंत महत्त्वाच्या आणि मोक्याच्या ठिकाणचे कारखाने, व्यापारी संस्था आणि पत-संस्था यांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर उरलेल्या खासगी क्षेत्राचें काय होईल ?

उत्पादन, व्यापार, वाहतूक इत्यादि विभागातील उरलेल्या खासगी क्षेत्राचें कार्य आणि त्याचा विकास चालूच राहील एवढेंच नव्हे तर तो विकास पूर्वीप्रमाणे खुरटून टाकणाऱ्या राक्षसी मक्तेदारीच्या छायेंत न होतां स्वत च्या गतीने आणि पद्धतीने होत राहील

मध्यम आणि लघुउद्योगाव्यतिरिक्त शेतीचाहि एक प्रचंड विभाग असतो. त्याच्याकडे लक्ष देऊन त्याची नव्या पद्धतीने जोपासना करावी लागते. खासगी क्षेत्राच्या या विभागाचा कायापालटच होऊन जातो

मक्तेदारी भांडवलाचे पाठीराखे जनतेला नेहमी अशी भीति दाखवीत असतात की, त्याच्या विनाशाबरोबर कार्यक्षमता, तात्विक प्रगति, भांडवलाची निर्मिति, संघटित बाजारपेठा, किंमती, नोकऱ्या वगैरे सर्वांचा नाश होईल किंबहुना त्याचें असें म्हणणें असतें की, खासगी मक्तेदारी नष्ट होण्याबरोबरच सर्व खासगी, औद्योगिकसाहस आणि खासगी मालकी नष्ट होईल जगाचा अंत होईल, भारतीय भाव विश्वांत आदरणीय असें जें जें आहे त्या सर्वांचा नाश होईल भविष्य-कालाबद्दलच्या या सर्व निराशामय विचारांना गाडगीळ थारा देत नाहीत एवढेंच नव्हे तर मक्तेदाराच्या हातात नेतृत्व असल्यानेच आज स्वयपूर्णत्व आणि भरभराट यांकडे नेणारी भारताची विकासाची गति मंदावली आहे असें त्याचें म्हणणें आहे

भांडवलाच्या निर्मितीचें आणि म्हणूनच सातत्याने विकास होत राहण्याचें आपणच सर्वांत मोठें केंद्रस्थान आहोत हा मक्तेदारीचा दावाहि गाडगिळांनी नाकारला आहे जुन्या सिद्धान्तानुसार, मक्तेदार भांडवलदार, ‘भोगपराङमुखता’ (Abstenance) आणि स्वार्थत्याग याच्या जोरावर किंवा त्यांच्या व्यावसायिक धडाडीमुळ भांडवलाची निर्मिति करतात ही भ्रामक कल्पनाहि गाडगिळानी उधळून लावली आहे. राष्ट्रीय विकास समितीला १९५६ च्या जाने-वारी महिन्यात सादर केलेल्या निवेदनात ते म्हणतात

“इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनसारख्या संस्थाच्या मार्फतीने आणि काही मोठ्या उद्योगांना, मोठ्या प्रमाणावर, प्रत्यक्ष भांडवल-पुरवठा करण्याच्या सरकारी धोरणाच्या द्वारें आधुनिक उद्योगांना

लागणाऱ्या भांडवलाचा फार मोठा भाग सरकारकडूनच पुरविला जात आहे खासगी क्षेत्राला सार्वजनिक क्षेत्राकडून पुरविल्या जाणाऱ्या भांडवलाचें प्रमाण सतत वाढत आहे आणि झालेल्या बदलामुळे (मक्तेदारीतून बिगरमक्तेदारीकडे – एस्. ए डी.) जर खासगी क्षेत्राला (येथे गाडगिळांना बिगर मक्तेदारी क्षेत्र अभिप्रेत आहे–एस् ए डी ) लागणाऱ्या भांडवलाच्या पुरवठ्यात कमतरता निर्माण झाली तर बदललेल्या आर्थिक आणि सामाजिक धोरणामुळे सार्वजनिक क्षेत्राला ती भरून काढणें सहज शक्य होईल" (पा. ३१)

दुसरें असे की, सामाजिक उत्पादन मक्तेदारानी लुबाडून घेणे या संदर्भात मक्तेदारांनी भांडवलाची निर्मिति करणें याचा काय अर्थ होतो याकडे गाडगिळानी खास लक्ष वेधलें आहे

"नफ्याची पातळी बरीच वरची असल्याशिवाय आणि मक्तेदारी भांडवलशाही विभागाच्या चालकांतील अत्यंत श्रीमंत वर्गाचे जीवनमान बरेंच उच्च असल्याशिवाय श्रीमंताच्या हातानें फारशी भांडवलनिर्मिति होणार नाही." (पा ३१).

इतरत्र गाडगिळानी मक्तेदारी भांडवलशाही क्षेत्रातील अत्यंत श्रीमंत विभागाकडून साधनसामग्रीबाबत आणि उत्पादनाबाबत कोणत्या प्रकारच्या मागण्या केल्या जातात याचें अत्यंत विदारक चित्र रेखाटलें आहे. गरिबाना कापडपुरवठा करण्याच्या योजना उधळून लावल्या जातात आणि टेरिलीनचे कारखाने उभारण्यासाठी प्रचंड भांडवल गुंतविलें जातें, सर्वसामान्य कामगाराला घर मिळत नाही आणि आलिशान, सुखासीन हॉटेल व राहण्यासाठी राजेशाही प्रासाद बांधले जातात, अमेरिका आणि ब्रिटन या देशातून जे पगार आहेत त्याच्याशी तुलना करून, कधी ऐकलें नाही असे प्रचंड पगार आणि इतर सवलती अधिकाऱ्याना दिल्या जातात आणि कामगाराला मिळणारे दरिद्री वेतन मात्र गोठविण्याची भाषा केली जाते, बाजारभावाना ताळतंत्र राहत नाही इत्यादि गाडगिळांनी आपल्या आटोपशीर आणि मुद्देसूद भाषेत मक्तेदारी भांडवलशाहीचें विदारक चित्र, कोणालाहि समजेल अशा रीतीनें रेखाटले आहे ते म्हणतात

"म्हणून आजच्या अवस्थेत, श्रीमंताच्या, धनवानाच्या हातात भांडवल कसें तयार होईल या विचाराचा प्रभाव आपल्या आर्थिक आणि इतर धोरणावर पडू द्यावयाचा नाही असा निर्णय घेण्याची जरुरी आहे असें वाटतें वर जें म्हटलें त्याचा सर्वसामान्य खासगी कारखानदारीशीं फार थोडा संबंध आहे कारण लघु-उद्योगात आज जेवढी भांडवलनिर्मिति होत आहे तिच्यावर समाजवादी मार्गाने जाण्याच्या हेतूने आखल्या जाणाऱ्या आर्थिक अगर विनिमयासंबंधीच्या धोरणाचा कांहीहि परिणाम होणार नाही" (पा ३१)

खासगी क्षेत्रांतील बिगरमक्तेदारी विभागाचे दोन भाग पडतात, एक उद्योग, व्यापार इत्यादीचा आणि दुसरा शेतीचा

मक्तेदारी धंदे सरकारी क्षेत्रात सामील केल्यानंतर बिगरमक्तेदारी औद्योगिक विभागाला विकासाची प्रचंड संधि प्राप्त होते त्याचा फायदा प्रथमत मध्यम आणि लघु-उद्योग, कुटिरोद्योग आणि हस्त-व्यवसाय इत्यादींना होतो

याचा अर्थ हा विभाग तांत्रिक दृष्ट्या खालच्या पातळीवर चालतो असा करावयाचा काय ? आणि तसें झालें तर त्यामुळे उत्पादन-क्षेत्रा-तील सामाजिक श्रमाच्या किमतीत वाढ होणार नाही काय ? त्यामुळे अर्थव्यवस्था सपाट – उत्पादनाच्या वरच्या पातळीवर जाण्याच्या आणि परिणामी जीवनमान उंचावण्याच्या मार्गांत अडथळे निर्माण होणार नाहीत काय ?

या प्रश्नाचे उत्तर दोन रीतींनी देतां येईल एक – मोठ्या प्रमाणा-वरील मक्तेदारी भांडवल सरकारी क्षेत्रात समाविष्ट करावयाचे याचा अर्थ मोठ्या प्रमाणावरील उत्पादन बंद करावयाचें किंवा मोठ्या प्रमाणावरील उत्पादनात अभिप्रेत असलेली तांत्रिक प्रगति बाजूला सारावयाची असा नाही. किंवा दोन – खासगी मक्तेदारी भांडवलाने मोठमोठ्या कारखान्यांतून भांडवल गुंतवून प्रगत तंत्र उपयोगात आणले हें खरें असलें तरी सुद्धा या तांत्रिक विकासाचा उपयोग, वस्तूचें उत्पादन प्रचंड प्रमाणांत होऊन त्याचा पुरवठा वाढावा त्याचबरोबर ग्राहकालाहि त्या वस्तु स्वस्त मिळाव्यात व सर्व समाजाचें जीवन सुखी

व्हावे यासाठी केला जात नाही. मोठ्या भांडवलदारी देशातून तांत्रिक क्षेत्रात जी क्रांति घडून आली ती जनतेचे जीवनमान कायम ठेवण्या॰ साठी, ते जास्त स्वस्त आणि सुखी करण्यासाठी आवश्यक म्हणून घडवून आणली गेली नाही तर युद्धाच्या गरजा भागविण्यासाठी म्हणून घडविली गेली असे जर नसतें तर मक्तेदारी भांडवलाच्या अत्यंत सधन राष्ट्रातून बाजारभाव, बाजारपेठा आणि बेकारी यांचें अरिष्ट अस्तित्वात राहिलें नसते आणि तीव्रहि झालें नसतें. मक्तेदारी नष्ट करणे याचा अर्थ आधुनिक प्रगत तंत्राच्या साहाय्याने केलें जाणारें उत्पादन किंवा मोठ्या प्रमाणावरील उत्पादन बंद करणें असा होत नाही

अस्तित्वात असलेल्या पायावरच भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास सुरू झाला पाहिजे म्हणून स्वयंचलित मागाची रांग कितीहि आकर्षक दिसली तरी आपल्याला हातमागाचा पाया एकदम नष्ट करून भागणार नाही मानव समाजाचे आजचें हित आणि उद्याचें हित याचा समन्वय घातला पाहिजे या उद्याच्या हिताची जपणूक अर्थात् नव्या तंत्राचा स्वीकार करण्यानेच होऊ शकेल. गाडगिळाच्या समोर हा प्रश्न, एक मानवी प्रश्न त्याचप्रमाणे सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक पुनर्रचनेचा प्रश्न म्हणून उभा होता आणि या प्रश्नाकडे ते केवळ भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनांतून नव्हे तर विश्वव्यापी दृष्टिकोनातूनहि पाहत होते

त्यासंबंधी आपल्या निवेदनात ते म्हणतात

"तांत्रिक प्रगतीची सर्वसाधारण दिशा आणि आजच्या अर्थव्यवस्थेतील सामान्य बाजारपेठेतील शक्तींचें कार्य या दोहोंचा परिणाम उत्पादनाचें आणि लोकसंख्येचें केंद्रीकरण होत राहणे हाच होतो." (पा ३१)

हा सर्वसामान्य नियम त्यांनी सांगितला. परंतु हा नियम गाडगिळांना बदलावयाचा आहे. निदान त्याला मुरड घालावयाची आहे म्हणून ते म्हणतात, "म्हणून औद्योगीकरणाच्या बाबतीत त्याचप्रमाणे विद्युत्-निर्मिति आणि वाटप, शिक्षण आणि आरोग्य यासारख्या

आर्थिक आणि सामाजिक योजना आखताना त्यातून विकेन्द्रित अर्थ व्यवस्था निर्माण होईल असा प्रयत्न जर झाला नाही तर गाडें आहे त्याच दिशेने जात राहील.' (पा ३१)

असें न केल्याचे परिणाम आजच आपल्याला दिसत आहेत मुंबई आणि कलकत्ता यांसारख्या मोठमोठ्या शहरातून उद्योग आणि व्यापार याचें केंद्रीकरण होत आहे या केंद्रीकरणामुळे तेथील जमिनींच्या किमती आकाशाला भिडल्या आहेत, गृहबांधणीच्या योजना कोलमडून पडत आहेत आणि विस्तार कठीण होत आहे या सर्वांमुळ केवळ दळणवळणच नव्हे तर मानवी जीवनाचीं सर्वच अगें कुचबून गेली आहेत

परतु खासगी मक्तेदारी भाडवलाचे अस्तित्व हा विकेन्द्रीकरणाच्य मार्गातील अडथळा आहे असें गाडगीळ कां मानतात? फारच थोडे अर्थशास्त्रज्ञ प्रश्नाची उकल करण्यासाठी सोडवणुकीच्या मार्गाच्या या अगावर भर देतात याला प्रत्यक्ष औद्योगिक तत्र-शास्त्र हेंच स्वत. आणि सर्वस्वी जबाबदार नाही काय? या प्रश्नाची माडणी करताना गाडगिळांनी आणखी एका कारणाचा यथायोग्य उल्लेख केला आहे. तें म्हणजे, "आजच्या अर्थव्यवस्थेंतील सर्वसामान्य बाजारपेठेंतील शक्तींचें कार्य." राष्ट्रहित अगर मानवी मूल्यें इत्यादि कशाचाहि विचार न करता कोणत्याहि गोष्टींतून नफा उत्पन्न करण्याचा हेतु बाळगणाऱ्या खासगी मक्तेदारी भाडवलाने भारत स्वतंत्र झाला त्या वेळीं ब्रिटिश राज्यकर्ता वर्ग जे धागेदोरे आणि हितसबध मागे ठेवून गेला होता तेच हितसबध उचलून घेऊन वाटचाल सुरू ठेवली उद्योग, व्यापार, दळणवळण इत्यादि गोष्टी मुबई, कलकत्ता, मद्रास यांसारख्या शहरातूनच सुरू करण्याच्या ब्रिटिश भाडवलाच्या धोरणाची प्रेरकशक्ति, आयात-निर्यात व्यापाराच्या बाजारपेठा आणि 'घरच्या बाजारपेठेशी' असणारे लागेबाधे, हीच होती हें डोळ्यासमोर ठेवूनच त्यानी प्रमुख लोहमार्ग आणि राजमार्ग याची आखणी केली. त्यानतर भारतीय मक्तेदारी भांडवलाने विकासाच्या याच मार्गांत भागिदारी स्वीकारली आणि मोठ्या शहरांतून आधीच झालेल्या भाडवलाच्या

केंद्रीकरणाच्या दुष्परिणामाची तीव्रता वाढली उद्योग विखुरणें किंवा ते विकेन्द्रित ठेवणे याचा अर्थ, अर्थ-रचनेची एक नवी दिशा, नवें नियोजन आणि कांही काळ तरी कमी नफा असाच आहे

केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या दृष्टीनेहि याची गरज आहे परंतु, "कोणत्याहि देशात विकेन्द्रित पद्धतीचें औद्योगीकरण घडून आले नाही किंवा कोणत्याहि देशात तसा प्रयत्न झाला नाही" (पा ३१)

गाडगिळानी एक जागतिक प्रश्न म्हणून या प्रश्नाची वरीलप्रमाण माडणी केली (ते 'कोणत्याहि' राष्ट्राची 'आजची' अर्थव्यवस्था असें म्हणतात, भाडवली अर्थव्यवस्था असे म्हणत नाहीत) परंतु त्यानंतरच्या कालात औद्योगिक तंत्रशास्त्र आणि समाजवादी पद्धतीचा विकास यांमुळे गाडगीळ ज्याला 'शहरी औद्योगिक केंद्राचे' दोष म्हणतात ते टाळून औद्योगीकरण करणें शक्य झालें आहे एअरो विमानासारख्या प्रचड विमानाचें उत्पादन आज एकाच देशातील निरनिराळ्या केंद्रात विखुरलेलें आहे (उदा भारतातले मिग कारखाने) एवढेच नव्हे तर निरनिराळ्या देशांतहि विखुरलेलें आहे (उदाहरणार्थ, सुपर-सॉनिक विमानाचें उत्पादन अमेरिका आणि ब्रिटन येथील लॉकहीड आणि रोल्सरॉइस या कारखान्यांतून सयुक्तपणें होते) ट्रँझिस्टर तंत्राचा उपयोग आणि इतर क्षेत्रात झालेली तंत्र-शास्त्रातील क्रांति यामुळे विकेन्द्रीकरण करण्याचे नवे मार्ग उपलब्ध होत आहेत योजनाबद्ध विकेन्द्रीकरणाच्या दृष्टीने सोव्हिएट युनियन आपलें नवें औद्योगिक क्षेत्र सैबेरियांत निर्माण करीत आहे गाडगिळानी जो प्रश्न निर्माण केला तो सोडविण्याच्या प्रयत्नांची दिशा ही आहे

त्याचबरोबर हेंहि ध्यानात ठेवले पाहिजे की, योजनाबद्ध अर्थव्यवस्था असलेल्या समाजवादी देशांतून सुद्धा मोठ्या शहरांतून होणारें केन्द्रीकरण आणि होणारा विकास थांबविता आलेला नाही या सबधात प्रचड विकास झालेल्या मॉस्को आणि शांघाय या दोन शहराचा उल्लेख केला तरी पुरे होईल

याच दृष्टिकोनातून गाडगिळांनी योजनाबद्ध विकेन्द्रीकरणावर भर दिला आहे भारत सरकार मध्यम आणि लघुउद्योगांना मदत करण्यासाठी ज्या औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचा निर्णय घेतें त्या वसाहती सुद्धा मोठमोठ्या शहरांभोवतीच उभ्या राहतात किंवा त्या मक्तेदार भांडवलाचे पोटभाडेकरू बनतात आणि हे मक्तेदारी भांडवल, बाजारपेठेवर असलेल्या आपल्या प्रभुत्वाच्या जोरावर त्याना इतकें पिळून काढतें की, त्याना साध्या पुनरुत्पादनाच्या पातळीवर राहता येईल एवढाच नफा मिळत राहतो. त्या पलीकडे जाऊन वाढत्या प्रमाणावर पुनरुत्पादन करण्याची त्याना संधीच मिळत नाही या गोष्टीची नोंद गाडगिळानी घेतली असून त्याबाबत आपली नापसती व्यक्त केली आहे

या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्यानतर हें स्पष्ट होईल की, नव्या पद्धतीने औद्योगीकरण करावयाचें असेल तर त्यासाठी केवळ विकेंद्रीकरणाचें आणि खासगी क्षेत्रातील मध्यम व लघुउद्योगाचें साहाय्य पुरेसें पडणार नाही ही गोष्ट पैसा आणि तंत्र यावर सर्वंकष नियंत्रण असणारे प्रचड सार्वजनिक औद्योगिक क्षेत्रच करू शकेल 'खासगी' क्षेत्रात काम करणाऱ्या लक्षावधि लोकांची होणारी ससेहोलपट थांबविण्याचा आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा सुसगत आणि लोकशाही विकास वेगाने घडवून आणण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.

— ५ —

औद्योगिक उत्पादनात मक्तेदारी भांडवलाचें आणि खासगी व सामाजिक विभागाचें स्थान काय, याची चर्चा केल्यानतर गाडगीळ शेतीच्या प्रश्नाकडे वळले आहेत या क्षेत्रातील उत्पादनशक्ति आणि उत्पादन साधने औद्योगिक क्षेत्रांतल्यापेक्षा वेगळी असतात. येथे जमीन हें उत्पादनाचें प्रमुख साधन असतें आणि तिचे परिमाण किंवा क्षेत्र ठरलेले असतें कारखान्याप्रमाणे किंवा एखाद्या यंत्राप्रमाणे शेतजमीन

वाढविता येत नाही आणखी असे की, काही भाग सोडतां बाकी शेत-जमिनीच्या एकूण क्षेत्रावर लक्षावधि कुटुंबें शेती करीत असतात आणि ही कुटुंबें सर्व देशभर विखुरलेली असतात यांत उत्पादनाचा एकक किंवा गाडगीळ म्हणतात तो 'स्वतंत्र जबाबदार घटक' सामान्यत. एक कुटुंब असतें कुटुंबाचा प्रमुख असलेला प्रत्येक शेतकरी आपला व्यवसाय स्वतंत्रपणें करीत असतो आणि परिणामीं राष्ट्राचें एकूण शेतीउत्पादन देशभर पसरलेल्या लक्षावधि शेतकरी कुटुंबाच्या श्रमाचें एकूण फलित असतें "तेव्हा या सर्वांचे निर्णय आणि त्यांची कृति यावर परिणाम घडवून आणण्याची गरज असते आणि म्हणून शेती-साठी नियोजन याचा निश्चित अर्थ या असंख्य व्यक्तिगत उत्पादकाना कार्यप्रवण करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावें यासाठी योजना तयार करणें असाच आहे." (पा. १६५) आणखी परिस्थिति अशी असते की, शेतीतील जवळ जवळ प्रत्येक उत्पादनक्षेत्र बिनसरकारी असतें औद्योगिक क्षेत्राची परिस्थिति यापेक्षा वेगळी असते

शेतकऱ्याला प्रोत्साहन मिळावें यासाठी योजावयाच्या उपायाचीं अनेक स्वरूपें असतात उदाहरणार्थ कमी व्याजाने कर्ज देणें, सुधारित बी-बियाणें, खतें, यंत्रे पुरविणें, पाणी व बीजपुरवठ्याच्या योजना, कोठारें बांधणें, बाजारपेठेची सोय, शेतीसंबंधीची शास्त्रीय माहिती उपलब्ध करून देणें, मृद्संधारण (सॉईल कॉन्झर्व्हेशन) इत्यादि

वरील सर्व गोष्टी प्रत्येक उत्पादकाला, मग तो लहान, मध्यम किंवा मोठा असो, कूळ असो कीं प्रत्यक्ष मालक असो, फक्त तत्त्वत उपलब्ध असतात.

प्रत्यक्ष व्यवहारांत, शेतीसाठी लागणाऱ्या या सर्व गोष्टीना, जमीन-धारणेचा एकक असेल त्याच्या क्षेत्राच्या प्रमाणात जमिनींत घालाव्या लागणाऱ्या भांडवलाचेच स्वरूप प्राप्त होते शेती कसणार कूळ आपलें स्वत चे श्रम शेतींत ओतीत असलें आणि त्याला कुळाचे हक्क प्राप्त झालेले असले तरी त्या शेतकऱ्याला जमिनीवरून काढून टाकले जाण्या-पासून संरक्षण नसल्याने भांडवल म्हणून घ्यावयाच्या कर्जाला तो ती जमीन तारण म्हणून देऊ शकत नाही या दृष्टीनें विचार करता अशा

शेतकऱ्याची परिस्थिति जमीन मालक असलेला शेतकरी किंवा कायम कूळ किंवा कायद्याने जमिनीवरून काढून टाकण्यापासून संरक्षण मिळालेलें कूळ या सर्वांच्या मानाने गैरसोयीचीच असते.

दुसरं वैशिष्ट्य असें की, शेतींत घातलेलें भांडवल आणि शेतकरी कुटुंबाने स्वतःच्या श्रमशक्तीने किंवा शेतमजुराच्या विकत घेतलेल्या श्रमशक्तीने केलेला त्याचा उपयोग या दोहोंची किंमत भांडवल घालणाऱ्या शेतकऱ्याला प्रत्यक्ष बाजारपेठेंतून वसूल करून घ्यावी लागते याचाच अर्थ त्याने जीवनोपयोगी वस्तूंच्या किंवा उद्योगधंद्याला लागणाऱ्या कापूस, ताग, ऊस इत्यादि कच्च्या मालाच्या स्वरूपात बाजारपेठेंत आणलेल्या क्रयवस्तूंची तेथे जी किंमत येईल त्या किमतींतून वसूल करून घ्यावी लागते

परंतु बाजारपेठ आणि किंमती यावर प्रत्यक्ष उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याचें काहीच नियंत्रण असत नाही त्यामुळे बाजारात होणाऱ्या किमतीच्या चढउताराने कांहींना श्रीमंत बनविलें जातें तर काहींची धूळधाण होते परिणाम असा झाला आहे की, गेल्या २३ वर्षांत धान्याच्या आणि कच्च्या मालाच्या पुरवठ्याच्या प्रश्नाने लक्षावधि लोकाचें जीवन ग्रासून टाकलें आहे. अवर्षण आणि पिकें बुडणें यांमुळे ओढविणारें अरिष्ट आणि भांडवलशाही बाजारपेठ व तिने नियंत्रित केलेल्या किंमती हेच लक्षावधि लोकाचें जीवन बरबाद करणारे प्रमुख गुन्हेगार आहेत या बाबतीत गाडगिळांनी सुद्धा सरकार आणि त्याचीं धोरणें यानाच मुख्यत दोषी धरलें आहे प्रश्न असा आहे की, सरकार असें का वागतें ? हा विचार करताना गाडगीळ पुन्हा एकदा मक्तेदारी भांडवलाची भूमिका काय या आपल्या जुन्या प्रश्नाकडे वळले आहेत

जमीनदारी नष्ट केली गेली असली आणि जमीनसुधारणेचे व जमीनधारणेवर कमाल मर्यादा घालणारे कायदे पास झाले असले तरीहि पिकाऊ जमिनीचा फार मोठा भाग एकूण शेतकऱ्यापैकी फार थोड्या शेतकऱ्याच्या हातांत केंद्रित झालेला आहे याचेच अजूनहि शेती विभागावर प्रभुत्व आहे चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यांत म्हटल्याप्रमाणे, "एकूण शेतीउत्पादकांत लहान जमीन

धारक आणि शेतमजूर यांची सख्या ५२ टक्के आहे आणि एकूण शेतकरी कुटुंबाच्या ती २४ टक्के आहे" परतु या लक्षावधि लहान शेतकऱ्याच्या (२ हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या) ताब्यात एकूण केवळ १९ टक्के जमीन आहे

जादा उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जातींमुळे लहान जमीनधारकहि कर्जमुक्त होऊन त्याची भरभराटहि होईल, असें म्हटले जाते, परतु तें खरें नाही चौथ्या पचवार्षिक योजनेची रूपरेषा देताना म्हटलें आहे की, जमीनधारणेच्या बाबतीत "जी विषमता अस्तित्वात आहे तिच्यामुळे शेतीसुधारणेच्या नवीन तत्राच्या वापराचा परिणाम असा झाला आहे की, त्या तत्राचा वापर करण्यासाठी लागणारी साधनें असणारे आणि तशीं साधनें नसणारे याच्यांतील विषमतेची दरी आणखीनच रुद झाली आहे "

१९६८ सालच्या जून महिन्यात गाडगिळांनी युनिव्हर्सिटी कॉलेज-मध्ये 'भारतातील नियोजनापुढील समस्या' या विषयावर व्याख्यान दिलें त्यात त्यानी सरकारवर, ते अनेक प्रकारानी श्रीमत शेतकऱ्यालाच साहाय्य करीत आहे असा आरोप केला ते म्हणतात

"जमिनीच्या एकूण क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार केला तर हा प्रश्न तसा मोठा नाही असे अनेक कृषि-अर्थतज्ज्ञानी म्हटलें आहे याची या सबधात आपण जाणीव ठेवावी असे माझे आपणांस सांगणे आहे. आपण जर मध्यम आणि मोठे शेतकरी घेतले तर त्याच्याकडे एकूण जमिनीपैकी ७५ ते ८० टक्के जमीन आहे याचाच अर्थ असा की, ५० टक्के अगर जास्त शेतकऱ्याजवळ एकूण १५ टक्के किंवा त्यापेक्षा कमीच जमीन आहे याचा जरा जास्त विचार केला तर आपल्या असें ध्यानांत येईल की, प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत आपले जें अपयश आहे ते जास्त जास्त या मानवी बाजूचें आहे जें करण्यात आले आहे ते फार थोड आहे आणि त्यामुळे तुलनात्मकदृष्टया मुबलक जमीन असलेल्या मूठभर शेतकऱ्यांचाच विकास होऊं शकतो."

याचा सरळ अर्थ असा आहे की, शेतींतील भाडवलशाहीला आणि कुळाकडून जमीन कसून घेणे यासारख्या निम-सरजामशाही स्वरूपांना

पोषक ठरतील अशी धोरणे सरकारने जाणूनबुजून स्वीकारली आहेत आणि त्यामुळे धनिकाना खडाच्या स्वरूपातील उत्पन्न बहाल केलें गेलें आहे एखादी गोष्ट माडण्याची गाडगिळाची पद्धत कितीहि वैशिष्ट्यपूर्ण आणि नागमोडी असली तरी प्रमुख गुन्हेगाराकडे लक्ष वेधण्यास ते कधीच विसरत नाहीत

धान्यपुरवठा आणि किमती यांच्यातील गोंधळाचें वर्णन करताना गाडगिळानी सत्ताधारी महाभागानी ज्या गुन्हेगारी स्वरूपाच्या चुका केल्या त्याचें अत्यत सडतोड वर्णन केले आहे

"शेतीमालाच्या किमती स्थिर ठेवण्याच्या दृष्टीनें काहीहि करण्यास सरकार जो नकार देतें त्याचाहि या सबधात विचार करणें योग्य होईल शेतीमालाच्या किमती स्थिर ठेवणें याला, गेली जवळ जवळ दहा वर्षे, सरकारी धोरणाचा एक भाग म्हणून मान्यता देण्यात आली आहे अविकसित अर्थव्यवस्थेत त्याची गरज असते ही गोष्ट मोठ्या प्रमाणांत मान्य झालेली आहे असें असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारात सरकारने शेतीमालाच्या किमती स्थिर ठेवण्याचे धोरण स्वीकारण्यास सतत विरोध दर्शविला आहे, सतत टाळाटाळ केली आहे धान्याचें उत्पादन वाढविण्यासबधी काय करावें याची पुष्कळ चर्चा ऐकू येते, परतु त्यासाठी प्रत्येक हगामाच्या सुरुवातीलाच धान्याच्या किमान किमती जाहीर करून त्या मिळण्याची शाश्वती शेतकऱ्याला देण्याची साधी उपाययोजना कार्यवाहीत आणण्याचे पद्धतशीरपणें टाळलें जात आहे किमती स्थिर ठेवण्याच्या धोरणाची दुसरी बाजू किमतीची कमाल मर्यादा ठरविणें हीहि आहे औद्योगिक आणि इतर उत्पादनाला लागणाऱ्या खर्चाच्या दृष्टीने याला फार महत्त्व आहे परतु तें सुद्धा केलें जात नाही." (पा. १४५)

ही त्याची टीका १९५९ सालातील आहे त्यानतर आतापर्यंतच्या कालात पुष्कळच बदल झाला आहे परतु त्या वेळी सरकारने असे कां केलें आणि आजहि निराळ्या रीतीने परतु तेच कां केले जात आहे हें समजून घेणे आवश्यक आहे गाडगीळ म्हणतात

"सरकारच्या या आश्चर्यकारक वागणुकीचा एकच अर्थ लावणें शक्य आहे आणि तो असा की, शेतीमालाच्या किमती स्थिर ठेवण्याचे जे परिणाम निश्चितपणें झाले असते त्यांतले काही सरकारला मान्य होण्यासारखे नव्हते आणि म्हणूनच हा प्रश्न बाजूला टाकण्यात आला. किमती स्थिर ठेवण्याचें धोरण, दोन पद्धतींनी अमलात आणतां येतें. एक शेती उत्पादित वस्तूंच्या बाजारपेठेंत सरकारने फार मोठ्या प्रमाणावर स्वत उतरणें दोन हें क्षेत्र झपाट्याने सहकारी क्षेत्र बनविणें आणि त्याचबरोबर सरकारनेहि काही इतर आवश्यक गोष्टी करणें (पा १४६).

हें सांगून गाडगिळानी स्पष्ट आरोप केला आहे आणि आपलें सरकारबद्दलचें वर्गीय विश्लेषण दिलें आहे ते म्हणतात, "यापैकी कोणत्याहि मार्गाचा अवलब केला तरी त्यामुळे खोलवर भक्कमपणें रुजलेल्या सावकारी-व्यापारी हितसवधाना धक्का लागणार आहे हे दोन्ही व्यवसाय एकत्र आल्याने या लोकांची भारतीय अर्थव्यवस्थेवर भक्कम पकड निर्माण झाली आहे." (पा १४६)

परतु या वर्गांचे धागेदोरे पुष्कळच विस्तृत असून खोलवर गेलेले आहेत गाडगीळ म्हणतात

"ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर भारतांतील आजचा भांडवलदार वर्ग मुख्यत खेडेंविभागांतील सावकारी – व्यापार या सयुक्त व्यवसायाच्या पायावर उभारला गेला आहे हा पाया थोडा जरी डळमळीत झाला तरी त्यामुळे याच पायावर शहरी भागांतून उभारलेला व्यापारी इमलाहि अटळपणें धोक्यांत आल्याशिवाय राहणार नाही. एवढेंच नव्हे तर त्यामुळे **शहरातील वित्त भांडवलदारीलाहि धोका पोचण्याची शक्यता आहे म्हणजेच देशाच्या राजकारणांत आज जे हितसबंध सगळ्यांत सामर्थ्यशाली आहेत त्यांच्यावरच अत्यंत घातक परिणाम होण्याची शक्यता आहे.**" (पा. १४६)

लहान शेतीधारकाला सहकारी शेतीच्या योजनेंत सामावून घेऊन त्याला सुस्थिति प्राप्त करून देण्याचा मानवतेचा प्रश्नहि गाडगिळानी निर्माण केला आहे. ते म्हणतात

“ सहकारी क्षेत्राच्या संबधात आज जें सरकारी धोरण आहे तेंहि माझ्या वरील म्हणण्याला पुष्टी देणारेंच आहे शेतीला कर्ज पुरविणें, बाजारपेठा आणि पक्क्या वस्तु बनविण्याचे व्यवसाय हे खासगी व्यक्तींच्या हातांतून काढून घेऊन ते सहकारी संस्थांच्या हाती सोपविण्याचे हल्ली जे थोडेफार यशस्वी झालेले प्रयत्न आहेत त्यांयचकडे साहजिकच साशकपणें पाहिलें जात आहे आणि ज्या कार्यक्रमाने या प्रयत्नाना गति दिली आणि हा विकास शक्य केला त्या कार्यक्रमावरच आक्षेप घेतले जात आहेत आणि त्याच्या कार्यवाहीला सुरुग लावला जात आहे ” (पा १४६)

यावरून गाडगिळाना पुन्हा एकदा काय सांगावयाचें आहे ? त्याना हें सागावयाचें आहे की, मक्तेदारी भाडवल आणि त्याच्या सेवेंत असणारे शहरातील आणि खेडेंविभागांतील वित्त-भाडवल हे उद्योग, व्यापार आणि शेती यांच्यांतील उत्पादनशक्तीच्या आणि उत्पादनाच्या विकासाच्या मार्गांत अडथळे निर्माण करीत असतात

म्हणून राष्ट्रीयीकरण करून मक्तेदारी भाडवलशाहीचें कबरडें मोडावयाचें, लहान शेतीधारकाना सहकारात गोवून खेडेंविभागांतील वित्त-भाडवलाचे पख कापावयाचे आणि अन्नधान्याचा आणि व्यापारी पिकाचा ठोक व्यापार आणि आयात-निर्यात व्यापार याचें सामाजीकरण करून बाजारी किंमती ठरविण्याची जी भांडवलशाही यत्रणा आहे ती मोडून काढावयाची, या गोष्टी केल्याशिवाय आपली अर्थव्यवस्था आणि आपली लोकशाही विकसित होणार नाही. जनतेच्या हिताच्या दृष्टीने लोकशाही क्राति पुढे नेण्याचा हाच एकमेव मार्ग आहे शेतीच्या ज्या विभागात वाईट पीक आणि अवर्षण हे मुख्य शत्रु नसून ऐतखाऊ भाडवलशाही हा मुख्य शत्रु आहे, त्या विभागाच्या बाबतींतहि हेच निष्कर्ष काढण्यास गाडगीळ कचरले नाहीत.

— ६ —

याच मार्गाने जाऊन गाडगिळांनी वाढत्या किमती, वेतन आणि बेकारी या समस्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे त्यांनी मक्तेदारी भांडवल आणि त्याचे प्रचंड नफे, या 'पहिल्या पातकापासून' त्याचप्रमाणे किमतीच्या वाढीला गति देणारी आणि लहान प्रमाणावरील शेती व लघु-उद्योग यांची कुचंबणा करणारी किंवा त्यांना रसातळाला नेणारी, वित्त भांडवलाच्या नियंत्रणाखाली असणारी ठोक बाजारपेठेची यंत्रणा यापासून त्यांनी वरील तीन गोष्टी अलग केल्या नाहीत

गाडगिळांनी किमती, वेतन, प्राप्ति आणि बेकारी या प्रश्नाचा विचार, परस्परावलंबी प्रश्न म्हणूनच केला आहे परंतु त्यांना अभिप्रेत असणारें परस्परावलंबित्व सरकारी किंवा सनातनी अर्थशास्त्रज्ञाच्या कल्पनेच्या अगदी उलटें आहे त्यांना वेतन-किमतींची चढती कमान असतें हें मान्य नाही, किंवा वेतन, किमती आणि उत्पादकता यांची मोट बांधणे अगर त्याचा रोजगारावर परिणाम होतो असें मानणें हें त्यांना मंजूर नाही.

बाजारांतील किमती कोठून ठरतात या प्रश्नाला गाडगिळांचे उत्तर खालीलप्रमाणे आहे

"भारतांत वस्तूंच्या आणि आधुनिक मोठ्या संघटित व्यवसायाकडून मिळणाऱ्या सेवेच्या संबंधातील सर्वांत प्रमुख किमती कृत्रिमपणें ठरविल्या जातात ही वस्तुस्थिति सर्वमान्य आहे असें गृहीत धरून चालण्यास हरकत नाही अशा कृत्रिम रीतीने किमती ठरविणें किंवा त्या किमतींची पातळी काय असावी हें निश्चित करणें यावर सरकारचे फार थोडें किंवा खरें म्हणजे काहीच नियंत्रण नसतें जीवनोपयोगी वस्तूंच्या क्षेत्रांतील साखरेसारख्या महत्त्वाच्या वस्तूंच्या बाबतींत, त्या वस्तूंचे व्यापारी, त्या वस्तूंचे उत्पादक यांच्या प्रचंड नफ्यावर नियंत्रणें ठेवण्याच्या बाबतींत सरकार किती असमर्थ ठरतें हें जगजाहीर आहे" (पा ४१)

ज्या क्षेत्रांना सरकार आर्थिक साहाय्य देतें, देणग्या देतें आणि इतर रीतीने मदत करते त्या ठिकाणीं तरी सरकारने कांही तरी करावें असें म्हणता येईल त्यावर गाडगीळ म्हणतात

"हे ध्यानात घेणेंहि महत्त्वाचें आहे की, जेथे सरकार खास मदत करतें किंवा सवलती देतें त्यांतून होणाऱ्या नफ्यात कोणताहि सामाजिक हक्क किंवा सार्वजनिक हितसबंध याना वाटा न देता तो सर्व नफा ज्या व्यक्तीला सरकारने मदत केली असेल त्या व्यक्तीच्या खासगी मालमत्तेंत सामावला जातो त्यामुळे भविष्यांत केव्हा तरी त्या क्षेत्रांत सरकारने प्रवेश करण्याची शक्यता निर्माण होण्याच्या ऐवजी सार्वजनिक पैशातून आज दिल्या गेलेल्या या मदतीचा परिणाम सरकारने त्या क्षेत्रांत आपले हितसबंध प्रस्थापित करणें जास्त कठीण होण्यात होतो. याचा अर्थ असा की, सरकार जी सढळ हाताने मदत करतें तिचा आज किंवा भविष्यांत मोबदला मिळण्याची काहीच सोय नसते."
(पा १४१).

प्रचड नफ्याच्या पाठीमागे लागलेले लोक किमती कशा ठरवितात, आणि त्या सुद्धा सरकारने दिलेल्या मदतीच्या जोरावर, त्याची कथा ही अशी आहे

शेतकी मत्रालयातील अधिकारी आणि शेतकऱ्याला योग्य किमती आणि नफा मिळवून देण्याच्या सरकारी धोरणामुळे त्याचें कल्याण साधलें जातें असें म्हणणारे महाभाग असा दावा करण्याची शक्यता आहे की, निदान या क्षेत्रांत तरी उत्कर्ष आणि किमती याना वर्गीय पाया असत नाही अन्नधान्याच्या किमती आणि सरकारी धोरण या बाबतींत गाडगिळांचीं मतें काय होतीं तें आपण पाहिलेंच आहे. आता बाजारांत जाणाऱ्या उत्पादकाला मिळणाऱ्या 'उत्कर्ष साधणाऱ्या' किमतीबाबत त्याचें काय म्हणणें आहे तें पाहू

"शेतकऱ्याच्या भरभराटीची चर्चा करताना हें ध्यानांत ठेवणें योग्य होईल की, येथे जो नफा मिळतो तो मुख्यत **ठोक विक्रींतून किंवा कच्च्या मालावर प्रक्रिया करण्याच्या कामातून** मिळत असतो यात विशेष गोष्ट ही आहे की, शेतकऱ्याचा जो थर कोणत्या तरी रीतीने

या प्रक्रियेच्या अवस्थेशीं संबधित आहे तो किंवा वस्तूचा साठा करून ठेवण्याच्या सामर्थ्यामुळे जो या परिस्थितीचा फायदा घेऊ शकतो तो – अशाचीच फक्त भरभराट झालेली आहे" (पा १३६)

इतरांचें काय होतें ? "इतरांच्या बाबतींत त्याना किमतीच्या चढउतारामुळे विशेष नफे मिळविण्याची संधि प्राप्त होण्याच्या ऐवजी त्याच्या मिळकतीची सरासरी पातळी खाली येण्याचीच शक्यता असते श्रीमत शेतकरी आणि मागासलेल्या विभागातील शेतकरी याच्यात प्रचड तफावत असल्याचींच ही सर्व चिन्हे आहेत विकासाच्या योजना आणि खर्च याचा फायदा सुरक्षित आणि श्रीमत विभागानाच झालेला दिसतो आणि मागासलेल्या आणि गरीब विभागाना मात्र त्याचा जवळ जवळ स्पर्शहि होत नाही निरनिराळ्या भूविभागांत ज्या प्रकारची विषमता आहे त्याच प्रकारची विषमता वर्गांतहि आहे हेंच वरील अहवालावरून आढळून येतें." (पा १३६)

शहरें आणि खेडेविभाग याच्यातील विषमता आणखीच वाढली आहे. खेडेगावांत बहुतेक फायदा श्रीमत शेतकऱ्यानी आपल्या पदरात पाडून घेतला आहे. उलट शेतमजूर, गावगाड्यातील कारागीर आणि हगामी मजूर याची परिस्थिति खालावली आहे" "१९५१ सालाशीं तुलना करताना १९५९ सालीं कारखान्यांतील कामगारांच्या वेतनात उल्लेखनीय प्रगति झालेली नाही शहरात कामगारांच्या खालोखाल मासिक पगार घेणाऱ्या कर्मचाऱ्याना महत्त्व असतें. त्यांची परिस्थिति आहे तशीहि राहिली नाही, उलट थोडी खालावलीच आहे व्यापारी आणि कारखानदार यांचीच सातत्याने भरभराट झालेली दिसते त्यांतहि मोठ्यांचा आणि जे शहरांत राहता आणि ज्याचा प्रचंड सघटित धदा आहे अशांचाच जास्तींत जास्त फायदा झालेला दिसतो." (पा १३७)

शेतकरी, शेतमजूर किंवा औद्योगिक कामगार अगर मध्यमवर्गीय कर्मचारी यापैकी कोणाच्याहि परिस्थितीकडे पाहिलें तर त्याची पीछेहाट झाली आहे आणि एकंदर राष्ट्रीय उत्पन्नातील त्याचा वाटा कमी झाला आहे असेंच आढळून येईल अशा रीतीने या सर्वांची पिळवणूक

करण्यांत आणि किमती ठरविण्याच्या यत्नणेचा उपयोग करून राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा वाटा आपल्याकडे खेचून घेण्यात या मक्तेदारी भाडवलाचाच हात असतो असें आपणास पुन्हा एकदा दिसून येतें.

वेतनावरून किमती ठरतात आणि वेतनवाढीमुळे किमती वाढतात आणि ही वाढ समाजाला विघातक असतें असें प्रतिपादन करणारा, मक्तेदारी भाडवलशाहीचा पुरस्कार करणारा जो एक धदेवाईक अर्थतज्ज्ञाचा वर्ग आहे, त्यांच्यापेक्षा मिळकत आणि किमती याच्याकडे पाहण्याचा गाडगिळाचा दृष्टिकोन अगदी वेगळा आहे

वेतन आणि पगार या प्रश्नाकडे गाडगीळ केवळ कारखान्यातील कामगाराच्या किंवा खासगी क्षेत्रात काम करणाऱ्याच्या अगर सरकारी कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनांतून बघत नाहीत ते सबध अर्थव्यवस्थेत कामाला लागलेल्या एकूण श्रमशक्तीचा विचार करतात यासबधीचे त्यांचे काही उल्लेख अभ्यासनीय आहेत कमिशनला सादर केलेल्या एका निवेदनात (डिसेंबर १९५६) "वेतन आणि पगार यांतील फरक" यासबधी चर्चा करताना गाडगीळ म्हणतात "आज भारतात या दोहोत असणारा फरक फार मोठा आहे." (पा १४) परतु याची चर्चा करण्यापूर्वी त्यानी भारतात दिल्या जाणाऱ्या पगारावर भारताबाहेरच्या गोष्टीचा जो प्रभाव पडतो त्याचा उल्लेख केला आहे

"भारतातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या पगारावर सपूर्णपणें ब्रिटनमधील पगाराचा प्रभाव पडला होता आणि अजूनहि तीच परिस्थिति आहे भारतांत कार्य करणाऱ्या कांही परदेशी कपन्या, सरकारी दडपणाखाली अधिकाराच्या जागांवर भारतीयाची फार मोठ्या प्रमाणावर नेमणूक करीत आहेत त्यामुळे परिस्थितींत गोंधळ निर्माण करणारी आणखी एक शक्ति अस्तित्वात आली आहे या कपन्या कामावर ठेवलेल्या भारतीयाना जे पगार देतात त्याचा आज सरकारी आणि एतद्देशीय धद्यात जे पगार दिले जातात त्याच्याशी काहीहि मेळ बसत नाही" (पा १४)

बाहेरचें दुसरेंहि एक कारण असण्याची शक्यता आहे आणि तें म्हणजे, हिंदुस्थानात शाखा उघडणाऱ्या किंवा भारताबाहेरच्या शाखा-तून भारतीयाना नोकरीला ठेवणाऱ्या नव्या आणि वाढत्या आंतर-राष्ट्रीय व्यवहार असणाऱ्या कंपन्यांतून दिले जाणारे पगार

हे जे भारताबाहेरचे पगारमान आहे त्याचा प्रभाव दुसऱ्याहि एका दिशेने पडतो "सर्वसाधारण श्रीमतांच्या आणि विशेषत. मोठा व्यवसाय असणाराच्या जीवनातील अपेक्षांवर इतर देशांतील श्रीम-ताच्या आणि विशेषत पश्चिम युरप आणि उत्तर अमेरिकेंतील श्रीम-ताच्या रहाणीमानाचा पगडा बसलेला असतो"

वट्ट उत्पन्न किती असावे याच्या कल्पना वरील अपेक्षेनुसारच ठर-तात आणि याच भूमिकेवरून भारतातील खासगी क्षेत्रातील उद्योग व व्यापारावर प्रभुत्व असणारे लोक, व्यक्तिगत करावद्दलच्या सूचनांचा, तसेंच उत्पन्नावर मर्यादा घालण्यासारख्या सूचनाचा विचार करतात हॉटेल, प्रवास आणि प्रवाशाच्या सुखसोयी इत्यादि संब-धीच्या कल्पनावरहि याचाच प्रभाव पडतो "प्रवासी वाहतुकीपासून जे फायदे मिळण्याची अपेक्षा असते ते वरीलप्रमाणे सुखसोयींच्या अवास्तव कल्पना बाळगून राष्ट्रीय संपत्तीचा विनियोग चुकीच्या मार्गाने केला गेल्यामुळे नाहीसे तर होत नाहीत ना, याचा गभीरपणे विचार केला पाहिजे यावरून जीवनातील सर्व गोष्टींच्या बाबतींत उपभोगाचें मान काय असावे याबद्दलच्या आपल्या अपेक्षा कमी कर-ण्याची, तसेंच प्रत्यक्ष जीवनमानावर बाहेरच्या वस्तुस्थितीचे होणारे परिणाम शक्य तितके कमी करण्याची किती गरज आहे हें स्पष्ट होतें" (पा १५)

मजुरी, पगार आणि उत्पन्न या प्रश्नाची चर्चा करताना गाडगीळ पुन्हा म्हणतात, "लहान लहान गटाच्या, निम-स्वायत्त, लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या, कामाशी आणि राजकीय व आर्थिक सत्तेच्या विकेंद्रीकरणाशी जी जीवनमूल्यें निगडित आहेत त्याचा विचार करता, वरिष्ठ अधिकारी आणि शासकीय वर्ग हे समाजाच्या खालच्या स्तरा-

पासून संपूर्णपणें वेगळे पडतील असें त्यांचें राहणीमान असू नये ही आवश्यक गोष्ट आहे." (पा. २२)

पुढारी मंडळी नेहमी संयम पाळण्याचा उपदेश करीत असतात त्याला उद्देशून गाडगीळ लिहितात, "वस्तुस्थिति अशी आहे की, 'या-सवधांत आणि आपल्या सारख्या गरीब देशांत, जेथे उधळपट्टी न कर-ण्याची गरज आहे असा प्रचार पुढाऱ्याना नेहमी करावा लागतो, पुढाऱ्यानीच आपल्या उपभोगाचे मान जर मर्यादित ठेवलें तर त्याचा एकदर समाजावर मोठाच नैतिक आणि उत्साहवर्धक परिणाम होण्याची शक्यता आहे निदान उत्तेजनार्थ भरमसाठ पैसे देण्याची जनमानसावर जी प्रतिक्रिया होईल त्याचा आपल्या समाजावर विप-रीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही शिवाय सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचें किंवा अत्यंत जबाबदारीचे बौद्धिक काम करावयाचें तर त्यासाठी केवळ अगर मुख्यत उत्तेजनार्थ जादा पैसे मिळण्याचीच प्रेरणा पाहिजे असें वाटण्यासारखें भारतीय परंपरेंतहि कांही नाही आणि आजच्या भारतीय परिस्थितीतहि कांही नाही" (पा. २२)

ही सूचना सत्ताधारी गटाना मान्य होणारी नाही याची गाड-गिळाना पूर्ण कल्पना होती आणि हें मान्य होणार नसेल तर कष्ट करणाऱ्यांच्या मजुरीच्या आणि पगाराच्या बाबतीतहि एवढी ओरड करण्याचे काही कारण नाही असें त्याचें मत होतें.

हे सर्व प्रश्न एकमेकांवर अवलंबून आहेत हें स्पष्ट करण्यासाठी ते लिहितात,

"हे जे पैसे दिले जातात ते संपूर्णपणें भारतांत होणाऱ्या उत्पा-दनांतून निर्माण होतात आणि ज्या परिस्थितींत ते मिळतात ती कायम ठेवण्यास, देशाचा नियोजित विकास, त्यामुळे उद्योगावर येणारी बधनें आणि त्यातून अंतिम ग्राहकावर पडणारा बोजा या सर्व गोष्टी कारणीभूत होत असतात हें ध्यानात ठेवणे योग्य होईल." (पा २५)

कामगाराला किती कॅलरी लागतात, त्याच्या कुटुंबाचे अंदाजपत्रक काय असावे यावर सरकार, मालक आणि अर्थशास्त्रज्ञ गंभीरपणें चर्चा करतील, परतु स्वत चें अंदाजपत्रक काय असावे याबद्दल चकार

शब्द बोलणार नाहीत. याच कारणामुळे राष्ट्रीय उत्पादन कसें तयार होतें आणि समाजातील निरनिराळ्या वर्गांत आणि अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या विभागात त्याची वाटणी कशी होते या मूलभूत प्रश्नावर सर्वसाधारण निर्णय घेतले जावेत अशी मागणी कामगार करीत असतात

या सर्वसाधारण धोरणाची मांडणी खालीलप्रमाणे करता येईल.

"आर्थिक उद्योग खासगी विभागात असोत किंवा सार्वजनिक विभागात असोत, ते राष्ट्रातील व्यक्तीकडून चालविले जावोत किंवा परकीय व्यक्तीकडून चालविले जावोत, आणि त्यातून मिळणारा मोबदला मजुरी, पगार किंवा नफा यांपैकी कोणत्याहि स्वरूपात असो, एकूण राष्ट्रीय उत्पादनांतून मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या मिळकतीची कमाल आणि सापेक्ष मर्यादा काय असावी हें सरकारने आणि नियोजन अधिकाऱ्यांनीच ठरविले पाहिजे. तसेंच ही मिळकत लादलेली असो, कायद्याने ठरविलेली असो, ती सवलतीमुळे मिळालेली असो किंवा तिला अप्रत्यक्षपणें मान्यता दिली गेलेली असो त्या सर्व गोष्टी नियोजनाचाच एक भाग मानल्या गेल्या पाहिजेत म्हणून करविषयक धोरणाचा योग्य उपयोग करून किंवा प्रत्यक्ष कायद्याने **सर्व पगार त्याचप्रमाणे कारखान्याच्या संयोजकाला संयोजक म्हणून मिळणारें उत्पन्न याची योग्य पातळी ठरवून दिलीच पाहिजे."** (पा २५–२६). यानंतर गाडगिळांनी वेतन ठरविण्यासंबंधीच्या धोरणाबद्दल सर्वसाधारण नियम काय असावेत याची मांडणी केली आहे त्यांत कोठेहि 'वेतन गोठविण्याचा' उल्लेख नाही या नियमांची कक्षा अत्यंत व्यापक आहे आणि कामगारवर्गाची चळवळ करणारांनी त्याचा अभ्यास करणें योग्य होईल

'पगार आणि मजुरी यांतील फरक' या प्रश्नावर नियोजन मंडळाला १९५६ सालीं सादर केलेल्या निवेदनात गाडगीळ म्हणतात

"(१) विकास आणि नोकऱ्या निर्माण करणें यासाठी योग्य योजना तयार करून तिच्यामार्फत अत्यंत गरीब विभागातील जनतेचे आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत जीवन जगणाऱ्या वर्गांचे जीवन-

मान उचावणें हें योजनेचे एक प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे (२) उद्योगधंद्यातील असघटित कामगारविभागाला आणि शक्य तितक्या मोठ्या भूभागावरील सघटित शेतीविभागाला किमान वेतनाचा कायदा लागू केला पाहिजे (३) उद्योगधंद्यांतील सघटित विभागात सयुक्त सौदे आणि पगाराचे समान प्रमाण ठरविणे, याला उत्तेजन द्यावें. (४) सरकारी आणि निमसरकारी नोकरीत असलेले वरच्या दर्जाचे प्रशासक, इतर अधिकारी आणि बौद्धिक काम करणारे याना दिले जाणारे पगार आणि इतर सवलती व भत्ते यांना जास्त जास्त प्रमाणांत वस्तुनिष्ठ पाया देण्याचा सतत आणि पद्धतशीर प्रयत्न करावा. या प्रक्रियेचा एक प्रमुख उद्देश, सरकारी नोकरींतील अगदी खालच्या आणि अगदी वरच्या श्रेणींच्या पगारांतील फरक नियोजनाच्या अखेरीस आज इग्लडमध्ये आहे त्यापेक्षा जास्त असणार नाही, हा असावा निरनिराळी सरकारी खाती आणि सरकारी प्रतिनिधि यांच्यामार्फत होणारें पगारवाटप आणि मध्यवर्ती, राज्य, स्थानिक इत्यादि निरनिराळ्या पातळीवरील सरकारी अधिकाऱ्याकडून होणारें पगारवाटप यातील अतर कमी करण्याचा प्रयत्न करावा (५) आधुनिक खासगी धद्यातील वरच्या स्तरावरील अधिकाऱ्याना मिळणारा पगार व इतर सवलती व भत्ते याच्या मर्यादा सार्वजनिक नियमानुसार नियत्रित असाव्यात (६) सार्वजनिक सेवा आणि सार्वजनिक खातीं याच्यामार्फत मिळणाऱ्या सोयी-सवलतीचे व भत्त्याचें प्रमाण श्रीमत देशांतून आज आहे तेवढे न ठेवता आपल्या देशाचें एकूण उत्पन्न आणि आपल्या देशाची एकूण स्थिति याच्याशी ते सुसबद्ध असावे " (पा २६–२७)

हें लिहिल्याला पधरा वर्षें झालीं परतु सरकार काय किंवा नियोजनमडळ काय वरील धोरणाच्या जवळपास सुद्धा आलेले नाही. म्हणून कामगारानाच लढावे लागते आणि 'सप-मुक्त' अर्थव्यवस्थेचे आणि उत्पादकतावाढीचे कितीहि धडे दिले तरी त्याचा काहीहि उपयोग होत नाही.

बेकारीचा विचार करता तिचा पाया मूठभर लोकांच्या हातात सपत्ति केंद्रित होणें आणि गरीब शेतकरी आणि कामकरी याचा नाश

होत राहणे. या परिस्थितींत आहे असें गाडगिळाचें मत होतें खेडें विभागातील भांडवलदारानी चोपून काढलेला आणि श्रीमताना हित-कारक असणाऱ्या सरकारी धोरणामुळे सरक्षण न मिळालेला शेत-करी खेडगावातून हाकलला जातो आणि नोकरीच्या शोधार्थ शहराची वाट धरतो

शहरांतून आणि खेडेविभागातून मक्तेदार आणि वड्या भाड-वलदाराच्या हातात सपत्ति केंद्रित होणे याच मूलभूत नियमांतून सुशि-क्षिताच्या बेकारीच्या समस्येचा उद्‌भव होतो यामुळे उत्पादक शक्ती-च्या विकासाला जो अडथळा निर्माण होतो आणि नवे सुशिक्षित युवक बेकारीच्या खाईंत लोटले जातात काही शहरें, काही 'विभाग किंवा वर्ग याची भरभराट झाल्याचा कितीहि देखावा दिसत असला तरी बेकारी , वाढत्या किमती, घसरतें वेतन आणि मदी या सर्व आपत्ति ज्या मूळ आपत्तीतून पैदा होतात तिचा पाया विशिष्ट भाषिकासांठी किंवा प्रांतियांसाठी नोकरींत अग्रहक्क देणें यांसारख्या शामक उपायानी उखडला जाणार नाही गाडगीळ मक्तेदारी भाडवलाचे पक्के विरोधक होते आणि परखड भाषेत विचार मांडण्यास आणि सत्ताधारी वर्गावर जोरदार टीका करण्यास ते कचरले नाहीत यामुळे साहजिकच सत्ताधारी वर्गाने त्याचा आत्यतिक तिटकाराच केला

गाडगीळ व्यवहारी नियोजक असल्याने प्राप्त परिस्थितीवर चर्चा करण्यास आणि त्यावर नोकऱ्या उपलब्ध करून देण्यासारख्या तात्का-लिक आणि अल्पकालीन उपाययोजना सुचविण्यासहि ते तयार असत. परतु या अल्पकालीन आणि तात्पुरत्या उपायानी फारसा फरक होण्याची आशा त्याना कधी वाटली नाही 'नोकऱ्या आणि सामा-जिक धारण ' या प्रश्नावर १९५९ च्या जुलै महिन्यात सादर केलेल्या निवेदनात ते म्हणतात

परिस्थिति जास्तच बिकट होत आहे आणि शहरी बेकाराच्या प्रमाणात अवास्तव वाढ झाली असली तरी शहराकडे येणाऱ्याचा ओघ वाढतच आहे यावरून मूलगामी परिस्थितीचें प्रचड दडपण असल्या-चेच दिसून येत आहे सुशिक्षिताना नोकऱ्या देण्याचा प्रश्न अवघड

होत आहे आणि तरीहि शिक्षणाची संधि मिळावी म्हणून मागणी वाढ-तच आहे यावरूनहि वरील प्रचंड दडपणाचा प्रत्यय येतो शहरात होणारें स्थलांतर आणि सुशिक्षितांची बेकारी हे निरनिराळे अलग प्रश्न नसून एकाच सर्वसामान्य रोगाचीं तीं दोन लक्षणें आहेत. (पा १२६–१२७)

भारताच्या आजच्या परिस्थितींत भांडवलाची कमतरता असताना औद्योगीकरणासाठी अत्याधुनिक तंत्राचे साहाय्य घेतलें तर त्यामुळे बेकारीचा प्रश्न सुटू शकेल काय ? यावर गाडगीळ म्हणतात

'आजच्या आपल्या परिस्थितींत, एकूण नियोजनाच्या संदर्भात, कोणत्याहि उद्योगात कार्यक्षम उत्पादन होण्यासाठी सामान्यत जेवढें भांडवल आवश्यक लागतें त्यापेक्षा जास्त भांडवल लागणाऱ्या तंत्राचा उपयोग त्या उद्योगांत करणें याचा अर्थ इतर उद्योगाना लागणारा अत्यंत महत्त्वाचा घटक त्याच्यापासून काढून घेणें असाच आहे म्हणून असे करणे केवळ समाजविरोधी आहे असें नव्हे तर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेहि ते अयोग्य आहे अशा प्रकारें जादा भांडवलाचा उपयोग करण्याची सत्ता जेव्हा सार्वजनिक नव्हे तर खासगी व्यक्तीच्या हाती असते तेव्हा अशा कृत्याची वर दिलेली जी बाजू आहे तिच्यावर जास्तच भर दिला पाहिजे. परंतु सार्वजनिक उद्योगात ही गोष्ट क्षम्य नाही." (पा १५२)

भारतीय अर्थरचना आणि तिचा तांत्रिक पाया याची आजची अवस्था विचारात घेतां ज्यांना स्वयंचलित यंत्राबद्दलच्या गालब्रेथच्या विचारसरणीचा अवलंब करावयाचा आहे त्याना हे उत्तर आहे

हें सांगितल्यानंतर गाडगीळ पुन्हा एकदा आपल्या जुन्या मित्राकडे मक्तेदारी भांडवलाकडे वळले आहेत

"आमचा असा निष्कर्ष आहे की, आपल्या विकासाचें नियोजन सर्वसाधारणपणें लघु-उद्योगाच्या धर्तीवर असावे आणि आधुनिक उत्पादन-तंत्राच्या दृष्टीने जेव्हा मोठ्या प्रमाणावरील केंद्रित भांड-वलाचा उपयोग करण्याची आवश्यकताच असेल तेथेच फक्त तो जाणीवपूर्वक करावा. या आमच्या निष्कर्षाला वरील छोटेंसे निवेदन

पूरकच आहे याचा उघड उपसिद्धान्त असा आहे की, जाणीवपूर्वक स्वीकारलेले हे अपवाद काटेकोर सामाजिक नियंत्रणाखाली असले पाहिजेत आणि शक्यतो त्याना सार्वजनिक क्षेत्रातच परवानगी दिली गेली पाहिजे " (पा १५२–१५३)

परतु सार्वजनिक क्षेत्राच्या विरोधकानी हें धोरण उधळून लावलें तर ? त्यावर गाडगीळ म्हणतात, "यापेक्षा वेगळ्या धोरणाचें समर्थन करावयाचें म्हणजे आपण असें मानलें पाहिजे की, सर्व मानवी साधनाचा उपयोग करणें हें महत्त्वाचें राष्ट्रीय उद्दिष्ट नाही, रोजगार आणि कमी रोजगार यासाठी जी माणुसकीच्या दृष्टीने आणि आर्थिक किंमत द्यावी लागते त्याचा नियोजनाशीं कांही संबंध नाही आणि औद्योगिक उत्पादन आणि भांडवल याचें फार थोड्या खासगी व्यक्तीच्या हातांत अतीव केंद्रीकरण होणें यामुळे राष्ट्राला काहीहि धोका पोचत नाही " (पा १५३)

मानवी मन असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या हृदयाला चटका बसेल असें हें विधान केल्याबद्दल आजच्या समाजव्यवस्थेचा आणि मक्तेदारी भाडवलाचा कोणता भाट गाडगिळांना क्षमा करील ? गाडगिळाचें असें ठाम मत होतें की, आजच्या परिस्थितींत आपण " विकेन्द्रित आणि विखुरलेलीं औद्योगिक क्षेत्रेंच निर्माण केलीं पाहिजेत " (पा १५३)

आणि पुन्हा एकदा त्यानी राज्यकर्त्या पक्षावर टीकास्त्र सोडलें आहे ते उघडपणें म्हणतात, " गेल्या दहा वर्षांतील राजकीय घोषणाचा हा एक भाग होता परंतु भाषा कांहीहि असली तरी प्रत्यक्षात सरकारी धोरणाचा परिणाम मोठमोठ्या संघटित धद्याचा आणि प्रचंड शहरी केंद्राचा विकास होण्यांतच झाला आहे. " (पा १५३).

तरी सुद्धा त्यानी लहान शहरें हाच केंद्रबिंदु करून सर्व देशभर निदान सार्वजनिक कामाचा आणि सामाजिक, आर्थिक उद्योग सुरू करण्याचा कार्यक्रम हातीं घ्यावा अशी पुन्हा पुन्हा विनती केली आहे लोकांना काम मिळावें म्हणून निदान सार्वजनिक-क्षेत्रातील आधुनिक

राक्षसी उद्योगाच्या बरोबरच पुष्कळ लोकाना काम देणारे जे परपरागत उद्योग आहेत त्याना सरक्षण देण्याचा कार्यक्रत हाती घ्यावा आणि एक मधलें तत्र " निर्माण करावें अशीहि मागणी त्यांनी केली

एका बाजूला प्रचड भरभराट आणि दुसऱ्या बाजूला भयाण दारिद्र्य हे दोन्ही पाहून अर्थशास्त्रज्ञ आणि पितृवत्सल गाडगिळानी पुढच्या पिढीच्या, विशेषत मक्तेदारी भाडवलशाहीच्या शक्तींना बळी पडलेल्या लहान पोरक्या बालकांच्या काय गरजा आहेत याचीहि नोद घेतली आहे 'नोकऱ्या आणि सामाजिक धोरण' या वरील निवेदनाच्या अखेरीस ते म्हणतात

"शाळेतील मुलाना जेवण देण्याच्या काही अपुऱ्या आणि मर्यादित योजना कांही प्रातिक सरकारानी कार्यवाहींत आणल्या आहेत. कांही प्रातांनी केलें आहे त्याप्रमाणे गरीब आणि पोरक्या मुलांची काळजी घेण्याच्या कार्यक्रमावर भर दिला पाहिजे माझें असें म्हणणें आहे की, वर्तमान आणि भविष्यकालासाठी सामाजिक, आर्थिक गुतवणूक म्हणून तरुण भिकाऱ्यांची काळजी घेण्यापेक्षा गरीब आणि पोरक्या मुलाची काळजी घेण्याच्या कार्याला बराच वरचा क्रम द्यावा लागेल एवढें म्हटलें म्हणजे माझा दृष्टिकोण स्पष्ट होईल असें मला वाटतें." (पा १२१)

किमती, मिळकत, मजुरी, पगार आणि नोकऱ्या या प्रश्नाचा आढावा घेऊन शेवटीं गाडगिळानी पुन्हा एकदा सत्तेचें खरें स्वरूप काय आहे यावर नेमकें बोट ठेवले आहे

"राष्ट्रीय उत्पन्नाचा प्रमाणाबाहेर मोठा वाटा ज्याच्या हातांत राजकीय आणि आर्थिक सत्ता आहे त्यांच्या आणि ज्या वर्गांतून राजकीय आणि सामाजिक पुढारी येतात त्या वर्गाच्या वांट्याला जातो." (पा. २६)

म्हणून आता गाडगिळाची राजकीय सत्ता, तिचें वर्गीय स्वरूप नोकरशाही आणि लोकशाही इत्यादि प्रश्नासबधी काय मतें होतीं हे जाणून घणें आवश्यक आहे

- ७ -

शासनसत्तेच्या प्रश्नाचा म्हणजेच सत्ता कोणत्या वर्गाच्या हातात आहे, कोणता 'वर्ग' ती राबविण्यासाठी यत्रणा उभी करतो याचा विचार केल्याशिवाय कोणत्याहि राष्ट्रातील अर्थव्यवस्थेचा विचार करणें शक्य नाही.

गाडगिळाची ख्याती राजकीय चळवळ करणारे म्हणून नव्हती तर अर्थशास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून होती त्यावरून सर्वसाधारण समजूत अशी आहे की, नियोजनासबधीच्या आणि अर्थशास्त्रावरील आपल्या लिखाणात त्यानी राजकीय प्रश्न निर्माण केले नसतील परतु ही समजूत चुकीची आहे नियोजन-मंडळाला सादर केलेल्या आपल्या निवेदनातहि त्यांनी आपलें असे स्पष्ट मत माडले आहे की, शासन-सत्ता, वर्गीय सत्ता, नोकरशाही, लोकशाही क्रातीची गरज इत्यादि गोष्टीचा विचार केल्याशिवाय एकदर देशासाठी सर्व जनतेचे हित डोळ्यासमोर ठेवून नियोजनाचा आराखडा तयार करताच येणार नाही या प्रश्नावर एखादें स्वतत्र निवेदन त्यांनी नियोजन-मडळाला सादर केलें नाही परतु आपले अर्थविपयक सिद्धान्त आणि नियोजनाचें अतिम यश त्यांनी या मूलभूत प्रश्नाशी निगडित केलें आहे वर्ग सबधाचें अत्यत स्पष्ट दर्शन अर्थशास्त्रच घडविते आणि गाडगीळ आपल्या क्षेत्रांत आणि विशेषत अर्थशास्त्रांत खऱ्या अर्थाने शास्त्रवेत्ते असल्याने त्याना या महत्त्वाच्या प्रश्नाकडे डोळेझाक करणें शक्यच नव्हतें याबद्दलची आपली मूलभूत भूमिका त्यांनी खालीलप्रमाणे मांडली आहे

'तिसरी पचवार्षिक योजना कशी असावी ?' या आपल्या सुप्रसिद्ध प्रबधांत गाडगीळ म्हणतात

'देशाच्या अर्थव्यवस्थेचे प्रश्न हे मूलत राजकीय-आर्थिक प्रश्न आहेत हें मान्य करण्याची भारतीय अर्थशास्त्रज्ञांची परपरा आहे या सिद्धान्तांत वसाहतिक राजसत्तेचें रूपातर स्वतंत्र राजसत्तेंत झाल्याने काहीहि फरक होत नाही कोणत्याहि राष्ट्रांत ज्या वर्गाच्या

हातांत प्रत्यक्ष सत्ता असेल त्याच वर्गाच्या हिताच्या दृष्टीने धोरणे आखलीं जातात या संदर्भात आपण असें म्हणणें योग्य होईल की, आज भारतातील सर्व सत्ता आधुनिक संघटित उद्योगपति आणि व्यापारी वर्ग यांच्या हातात आहे सर्व आर्थिक धोरणें, त्यांचा घोषित हेतु कांहीहि असो, या वर्गाचा फायदा होईल याच दृष्टीने कार्यवाहीत आणण्यात आलीं आहेत" (पा १४८)

प्रश्नाची या पद्धतीने मांडणी करून गाडगिळानी जनतेचे सार्व-भौमत्व, लोकशाहीवादी जनतेने सत्तेचा वापर करणें इत्यादि सर्व प्रकारची फसवी भाषा आणि कल्याणकारी राज्याची कल्पना उधळून लावली आहे

आजपर्यंत असें सांगितलें गेलें की, वर्ग, वर्ग-लढा, वर्गीय-सत्ता, भाडवलदार आणि मक्तेदार भांडवलदार यानी शासनसस्थेचा उपयोग स्वत च्या हितासाठी करणें ही सर्व भाषा दुष्ट कम्युनिस्टाची असते म्हणून गाडगिळाच्या सारख्या सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाचे आणि एक-वेळच्या भारताच्या नियोजन-प्रमुखाचे याबद्दलचे विचार काय होते हें समजून घेणें योग्य होईल आपले मूलभूत विचार मांडताना ते पुढे म्हणतात

"एका गोष्टीची नोंद घेणें आवश्यक आहे खरी सत्ता तुलनात्मक दृष्टीने लहान गटाच्या हातांत असून या गटात प्रवेश मिळविणें जास्त जास्त बिकट होत चालले आहे या विशिष्ट गटातहि प्रभुत्वाचें जास्त जास्त केंद्रीकरण होत आहे आणि निर्णायक सत्ता अत्यंत संकुचित पाया असलेल्या काही शेकडे लोकाच्या हातात जाऊन बसली आहे भारताचा सामाजिक इतिहास एका नव्या कालखडांत प्रवेश करीत आहे असे वाटतें भटभिक्षुक, बुद्धिजीवी आणि लढाऊ जाती याची पूर्वीची मक्तेदारी फार मोठ्या प्रमाणावर मोडून काढण्यांत आली आहे त्याऐवजी आता राजकीय आणि आर्थिक सत्ता, परपरागत व्यापारी जमातींतील निवडक विभागांच्या हातात जास्त जास्त प्रमाणात केंद्रित होत आहे" (पा १४८)

याचा अर्थ भारतांतील राजसत्ता सरकारी-मक्तेदारी भांडवलशाही अवस्थेला जाऊन पोचली आहे, ज्या अवस्थेंत मक्तेदारांचे प्रतिनिधि उघडपणे सरकारी सत्तास्थानीं जाऊन वसतात आणि मंत्रिपदांची वाटणी मक्तेदारी घराण्यांत होत राहते, असा करावयाचा काय ? अजून तरी भारतात अशी परिस्थिति नाही युरोपांतील राष्ट्राप्रमाणे किंवा अमेरिकेंतल्या प्रमाणे भारताचा राष्ट्रपति, प्रधानमंत्री, अर्थमंत्री आणि गृहमंत्री आणि इतर मंत्र्याच्या जागा अजून तरी प्रत्यक्षपणे मक्तेदारी घराणीं किंवा बडे व्यापारी याच्या कुटुंबियातून भरल्या जात नाहीत याचें एक कारण असें आहे की, भांडवलशाहीने आणि खास करून मक्तेदारी भांडवलशाहीने अजूनहि उत्पादन, विनिमय आणि वाटप याची सर्व क्षेत्रें व्यापून टाकलेलीं नाहीत आणि प्रगत भांडवलशाही राष्ट्राप्रमाणे राष्ट्रीय उत्पादन फार मोठ्या प्रमाणांत भांडवलशाही पद्धतीने होत नाही

भारतांतील भांडवलशाही, राजकीय मक्तेदारी भांडवलशाहीप्रमाणें शासनात पूर्णपणें एकरूप न होतांहि शासन-सत्तेचा उपयोग, कष्टकरी जनतेवर दडपशाही करण्याचे व तिची पिळवणूक करण्याचें साधन म्हणून करतेच भांडवलशाहीपूर्व किंवा सरंजामशाही कालांत जी कामें भारतातील राज्यकर्त्या जातीकडून केली जात तीच कामें आता नवा वर्ग, भांडवलदार वर्ग, आपल्या खेडेविभागांतील जातवाल्याच्या साहाय्याने पार पाडतो गाडगीळ आमची भाषा वापरीत नाहीत हे खरें, परतु त्याचें विवेचन आणि वर्गीय चित्रण जवळ जवळ आम्ही करतो तसेच आहे

भारतांत अजून शासन-सत्तेंतील उच्चपदस्थ व्यक्ति आणि पिळ-णाऱ्या वर्गांतील वरिष्ठ व्यक्ति या एकरूप कां झाल्या नाहीत याचें विवेचन करताना गाडगीळ लिहितात

"आजची परिस्थिति अस्थिर आहे मोठ्या उद्योगपतींनी उघड-पणें सत्ता गाजविणें ही गोष्ट अद्याप होऊ शकत नाही जनहिताच्या आणि समाजवादाच्या घोषणाची आणि त्या दिशेने थोडी फार प्रत्यक्ष कृति व्हावी म्हणून दडपण आणण्याची आज गरज आहे अन्नधान्याची

व्यापार ताब्यात घेणे यासारखी धोरणें राबविण्यात जो भोंगळपणा आलेला दिसतो तो अननुभवाचा परिणाम नसून अनिच्छेने स्वीकाराव्या लागलेल्या धोरणाची परिणामकारक अमलबजावणी झाली, तर त्यामुळे प्रभुत्व असलेल्या हित-सबधांना धोका पोचेल, तेव्हा तसे होऊ नये या प्रत्यक्ष किंवा गुप्त इच्छेचा तो परिणाम असावा या धोरणांची कार्यवाही तुलनात्मक दृष्टीने जमीन आणि शेती यासारख्या निरुपद्रवी क्षेत्रातच होत आहे परंतु ही कार्यवाही नेहमी तेवढयाच क्षेत्रात मर्यादित ठेवता येईल अशी खात्री देतां येत नाही" (पा १४८)

भारताचा आर्थिक विकास लोकशाही मार्गाने व्हावा ही 'नाइ-लाजाने स्वीकारावी लागलेली' जनतेची मागणी उधळून लावण्या-साठी जमीनदार-भांडवलदार हितसबध ती कार्यवाहींत आणली जाण्याच्या मार्गांत यशस्वीपणे जे अडथळे निर्माण करतात त्यामागील सत्य अशा रीतीने उघड झालें आहे देशाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यत महत्त्वाचे असणारे रांची, दुर्गापूर, भोपाळ आणि हरिद्वार येथील हेवी इलेक्ट्रिकल्सचे सार्वजनिक क्षेत्रातील कारखाने 'योजने'-प्रमाणे चालत नाहीत यावरून हेंच सिद्ध होतें की, मोठे उद्योगपति आणि मक्तेदारी-भांडवलशाही हितसबध, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग यशस्वी होण्याच्या मार्गांत अडथळा निर्माण करतात हें गाड-गिळांनी केलेले विश्लेषण बरोबर आहे

अर्थव्यवस्था आणि शासनसस्था याचा पाया वर्गीय असतो हे स्पष्ट केल्यानतर गाडगिळांनी ही शासन-यत्रणा कोण चालविते हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण केला आहे निवडलेल्या प्रतिनिधींची बनलेली एक विधि-सभा असते, खासगार, मत्री वगैरे व्यक्तीहि असतात बहुसख्य खासदार आणि आमदार, जो वर्ग सामाजिक, आर्थिक रचनेंत आर्थिक-दृष्टचा बलिष्ठ असतो त्याच्याच हितसबधाचें प्रतिनिधित्व करतात परंतु तेहि शासनयत्रणा चालवीत नाहीत निवडून आलेले खासदार, आमदार कायदे करतात आणि धोरणासबधीचे निर्णय घेतात परंतु, या निर्णयाची अम्मलबजावणी करणे, नेमणूक केलेल्या, पगारी, कायम स्वरूपाच्या नोकरशाहीच्या हाती असते ही नोकरशाही कोणाचें

प्रतिनिधित्व करते ? तो पिळणाऱ्या वर्गाचे प्रतिनिधित्व करते आणि नियोजित धोरणाच्या बाबतीत जनतेने लोकशाही पद्धतीनें हस्तक्षेप करणे आणि नियोजन यशस्वी करणें आणि नियोजन करण्यासाठी आवश्यक लागणारी धोरणें आणि प्रत्यक्ष काम याची योग्य जुळणी करणें ती अशक्य करून टाकते

"अशा तऱ्हेची जुळणी करणें की, ज्यामुळे सुसंगत धोरण-यंत्रणा अपरिहार्यपणें विकसित होईल. सर्वसामान्य हितसंबंधाच्या विरुद्ध कृति करणे भाग पडेल आणि ज्यामुळे वैयक्तिक बाबतीत वशिलेबाजी व लबाडी करणें पुष्कळच कठीण जाईल, एवढेंच नव्हे तर वैयक्तिक अधिकाऱ्याची संख्या आणि त्यांचे अधिकारहि कमी होतील. **सरकारी खात्यांची जुळणी त्यांचीं कामें सोपी करणें, आणि कामाचें विकेंद्रीकरण याला वरिष्ठ अधिकाऱ्याच्या गोटात पाठिंबा मिळण्याची शक्यता नाही. आणि हल्लीच्या काळात तर हे वरिष्ठ अधिकारी आणि संघटित उद्योग यांच्यात** अत्यंत घनिष्ठ **संबंध निर्माण होत** आहेत." (पा १४६)

आज भारतांत अस्तित्वात असलेल्या तांत्रिक लोकशाहीच्या बुरख्याखाली खरी लोकशाही उधळून लावणारी नोकरशाही हीच त्या खऱ्या लोकशाहीच्या मार्गातील सर्वांत मोठा अडथळा आहे

नियोजन यशस्वी व्हावयाचें तर तें विकेंद्रित असलें पाहिजे आणि त्याची आखणी करण्यात आणि राबवून ते यशस्वी करण्यांत जनतेला सहभागी करून घेतले पाहिजे पुष्कळ समाजवादी देशातून ही गोष्ट करण्यांत आली आहे गाडगिळानीहि रशिया, युगोस्लाव्हिया, चीन इत्यादींचीच उदाहरणें दिलीं आहेत भारतात असें केले तर "संघटित उद्योगाचें आणि वरिष्ठ नोकरशाहीचें आज जें राजकीय, आर्थिक दडपण आहे त्याला थोडाफार शह देण्यासाठी याचा उपयोग होईल" (पा. १५९)

शासनसंस्था, शासनातील शक्ति बनलेले वर्ग, भांडवलदाराच्या (मोठमोठ्या संघटित उद्योगाच्या) हितासाठी ती सत्ता राबविणारी नोकरशाही, त्याचप्रमाणे नोकरशाहीला काटशह देण्यासाठी जनतेने

सहभागी होणें, आणि एकूण प्रक्रियेचा उपयोग मक्तेदार भाडवलदाराना केवळ आपल्याच वर्गाच्या हितासाठी करता येऊ नये म्हणून विकेंद्रीकरण आणि सामाजिक सहकार्य याची गरज या प्रश्नाकडे गाडगीळ पुन्हा पुन्हा वळले आहेत

गाडगीळ आणि दुसरे एक प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री व्ही के. आर. व्ही राव यानी श्री सी डी देशमुख अर्थमंत्री असताना त्याना एक निवेदन दिले त्या निवेदनात त्यानी मक्तेदारीचें राष्ट्रीयीकरण केल्यानतर जें सार्वजनिक क्षेत्र निर्माण होईल तें चालविण्यासाठी नव्या शक्ति निर्माण करण्याच्या दृष्टीने काय करावयास पाहिजे हें सागितलें आहे त्यात खालील गोष्टींचा अतर्भाव केला आहे

"सार्वजनिक उद्योगासाठी लागणारी नवी माणसें सरकारी नोकरीत सामील करून घेता यावींत, त्याच्या दृष्टींत नवेपणा यावा आणि त्याना योग्य ती सधि मिळावी म्हणून अस्तित्वात असलेल्या वरिष्ठ सरकारी नोकराच्या एकसघ आणि साचेबद यत्रणेची पुनर्रचना करावी " (पा ३५)

हा मजकूर १९५६ सालीं लिहिलेला आहे सत्ताधारी वर्ग आणि घट्ट बसलेली नोकरशाही यानी गाडगिळानी आपल्या निवेदनांत कार्यवाहींत आणण्यासाठी ज्या या व इतर सूचना केल्या होत्या त्या कधीच प्रत्यक्ष व्यवहारांत येऊ दिल्या नाहीत याचे परिणाम केवळ सार्वजनिक क्षेत्राला भोगावे लागत आहेत असें नव्हे, तर सबध नियोजनाला आणि अर्थव्यवस्थेला भांडवली अरिष्टाचे अटळ गचके सोसावे लागत आहेत आणि नेहमीप्रमाणे त्याचें ओझें श्रमजीवी जनतेच्या खाद्यावर सरकविण्याचे प्रयत्न होत आहेत ही परिस्थिति कशी बदलणार आणि कोण बदलणार ?

१९५७ साली दुसऱ्या योजनेच्या भवितव्याची त्याचप्रमाणे आजची पद्धति लोकशाही रचनेच्या उभारणीला योग्य नसल्याने त्यात बदल करण्यासाठी आपण सुचविलेल्या योजनाची चर्चा करताना गाडगिळानी श्रमजीवी जनतेचें प्रतिनिधित्व करणाऱ्या खऱ्या लोकशाही वर्गाधिष्ठित पक्षाच्या आवश्यकतेचा प्रश्न निर्माण केला आहे ते म्हणतात

"एक गोष्ट ठामपणें ध्यानांत ठेवली पाहिजे की, आपल्याकडे हुकूमशहा नाही, आपल्याला काय हवें याची नक्की जाणीव असलेल्या निग्रही व्यक्तींचा लहानसा गटहि नाही किंवा ~~~ करण्यासाठी विणारा एकसंध पक्षहि नाही सर्वशक्तिमान वाटणारा कॉंग्रेस पक्ष हा अनेकविध विचाराचा बनलेला असून तो जनमत आणि जनतेच्या प्रतिक्रिया याच्या बाबतीत अत्यत सवेदनाशील आहे त्याची रचना आणि कार्यपद्धति कम्युनिस्ट राष्ट्रातील सत्ताधारी पक्षापेक्षा हिदु समाज पद्धतीशी जास्त मिळतीजुळती आहे त्याच्यांतील ज्या अनेक कमजोऱ्या वर सागितल्या त्या विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितींतून निर्माण झाल्या आहेत भारतांतील कम्युनिस्ट पक्षासकट इतर सर्व राजकीय पक्षांप्रमाणेच कॉंग्रेस पक्षात नेतृत्वस्थानीं असणाऱ्या व्यक्ति मुख्यत शहरातील व्यावसायिक आणि नोकरदार वर्गांतून आलेल्या आहेत गेल्या काही वर्षांत यांच्यांत आधुनिक उद्योगव्यवसायात वर्चस्व असलेल्या श्रीमत वर्गांतील आणि सधन व्यापारी वर्गांतील व्यक्तीची भर पडली आहे याचे जे पूर्वग्रह आणि हितसबध आहेत त्यामुळे कळत न कळत ते **खरी सामाजिक क्रांति घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारीं पावलें उचलण्याच्या मार्गांत अडथळा निर्माण करतात.** सत्ताधारी गटाच्या विशिष्ट वर्गीय रचनेमुळे ते शेतकरी जनतेपासूनहि अलग पडलेले असतात, त्यामुळे त्यांच्या गरजाच्या बाबतीत ते कमी सवेदनाशील असतात आणि शेतकऱ्याना आपण किती उत्साहित करूं शकू याबाबत ते नेहमी साशक असतात" (पा ५९)

अशा रीतीने शास्त्रज्ञ गाडगीळ, अर्थव्यवस्था, राजकारण आणि सामाजिक क्रांति यासबधीच्या प्रश्नाचा, एकसध वर्गीय पक्षाच्या आवश्यकतेसकट, सव बाजूनी विचार करतांना कचरले नाहीत

त्याच्या मृत्यूनतर त्यांच्यासबधी अनेक बुद्धुकानी लिहिलें असलें तरी वस्तुस्थिति अशी होती की, 'गाडगीळ अत्यत सखोल विचारवत होते आणि ते प्रत्येक प्रश्नाचा आणि प्रत्येक घटनेचा विचार द्वद्वात्मक पद्धतीने करीत सामाजिक क्राति म्हणजे काय याची जाणीव अस-

त्याने आणि ज्याचे हितसबंध खोलवर रुजले आहेत असे वर्ग आपल्या वर्गीय हितसंबधांना धक्का पोचेल अशा कोणत्याहि बदलाला किती करण आणि मेथ्य करतात हें माहीत असल्याने तुलनेसाठी आंतर-राष्ट्रीय अनुभव आणि घटना या विचारात घेण्यासहि त्यांनी मागेपुढे पाहिलें नाही सोव्हिएट रशियातील उत्तेजनाचें तत्त्व त्याना मान्य नव्हतें तरी त्याची नियोजन पद्धत त्यांना मान्य होती त्याचप्रमाणे १९५६ सालीं समानतेसाठी सर्वांवरच खडतर जीवन लादण्याची कल्पना त्याना पसत होती. आणि त्यासाठी नाखूप हितसबधियाविरुद्ध सरकारमार्फत सक्तीचा तसेंच दडपशाहीचा उपयोग करण्याची जरुरी लागली तर त्यालाहि, गाडगिळांची संपूर्ण संमति होती त्याच्या नेहमीच्या पद्धतीने याला नियंत्रक यंत्रणा म्हटलें पण खरोखरच त्याच्या मनांत कोण होतें ?

"आजच्या धद्याना शिस्त लावण्यासाठी, उत्पादन-लक्ष्यें पूर्ण करण्यासाठी आणि वाढू शकणाऱ्या मक्तेदारी कार्यपद्धतीवर बधनें घालण्यासाठी" गाडगिळांना 'नियंत्रक यंत्रणेची' गरज वाटे (पान ३३)

अशा प्रकाराना नियंत्रणें, सक्ती, जबरदस्ती वगैरे नावे देऊन ती कम्युनिस्ट पद्धतीच्या हुकूमशाहीचीं अगें आहेत म्हणून टीका करणारांच्यासाठी गाडगिळांनी बिगर कम्युनिस्ट आणि नियोजनमुक्त अर्थव्यवस्थाची उदाहरणें दिलीं आहेत ते म्हणतात

"पूर्व युरोपातील अर्थव्यवस्थाशी तुलना करता भारतांतील नियोजन-विभाग फार लहान आहे व नियंत्रण ठेवण्याची, वांटपाची वगैरे यंत्रणाहि अत्यंत अपुरी आणि अकार्यक्षम आहे वस्तुस्थिति अशी आहे की, पश्चिम युरोपातील ज्या राज्याची अर्थव्यवस्था नियोजन-मुक्त आहे असें म्हटले जाते अशा पुष्कळ देशातील सरकाराजवळ आर्थिक व्यवस्था नियंत्रित करण्याची जेवढी सत्ता आहे त्यापेक्षा भारतात ती कितीतरी कमी आहे कराच्या आणि इतर रूपांनी सरकारकडून जमा केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय संपत्तीचे प्रमाण भारतात पुष्कळच कमी आहे सरकारच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली

असणारें क्षेत्रहि तुलनेने पाहता त्या देशापेक्षा भारतांत लहानच आहे'
(पा १२)

भारतात आज भांडवलशाही अर्थव्यवस्था अस्तित्वांत आहे' अशा परिस्थितीत आणि जनतेच्या लोकशाही इच्छेप्रमाणे चालणारी शासनसत्ता अस्तित्वांत नसताना, राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा आणि जनतेचा उपयोग आपल्या विकासासाठी करू इच्छिणाऱ्या मक्तेदारी हितसंबधांचे सक्तीने नियंत्रण करील अशी यंत्रणा अस्तित्वात असल्याशिवाय नियोजन यशस्वी होणें अशक्य आहे. आणि असे केलें नाही तर ?

या बाबतीत काहीच करण्याची आपली तयारी नाही आजच्या आपल्या अवस्थेचे संभाव्य परिणाम असे होतील की, नियोजनापैकी कराचा आणि सार्वजनिक क्षेत्रात भांडवल घालण्याचा भाग तेवढा पुरा होईल आणि सहकारी यंत्रणा उभारण्यासाठी आणि विशेषत: आधुनिक उद्योगाच्या कारवायावर लक्ष ठेवण्यासाठी जरूर ते प्रयत्न केले जाणार नाहीत त्यामुळे नियोजनातील निरनिराळी लक्ष्यें कमी-जास्त प्रमाणात पूर्ण होतील आणि त्याहिपेक्षा धोकादायक परिणाम म्हणजे सामाजिक उद्दिष्टें साधण्यांत संपूर्णपणें अपयश येईल आणि आजच्या योजनेची कार्यक्षमता आणि भविष्य कालासाठी 'नियोजन करण्याची राष्ट्राची क्षमता' कमी होईल" (पा. ३३)

आणि गाडगीळ म्हणाले तसेच झालें दुसरी पंचवार्षिक योजना लांबवावी लागली तिसरी सोडून द्यावी लागली आणि चौथी अजून जन्मालाच आलेली नाही (नुकतीच जी योजना जाहीर करण्यात आली आहे ती सुद्धा लवकरच कोलमडून पडेल अशी खात्री बाळगण्यास हरकत नाही )

अर्थव्यवस्था विस्कळीत झाली आहे आणि कामगारवर्ग तसेच शेतकरी व मध्यमवर्गीय जनता, सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाच्या आणि हा पक्ष ज्या ऐतखाऊ वर्गाचे प्रतिनिधित्व करतो त्या वर्गाच्या सत्ते विरुद्ध बंड करून उभे राहू लागलेहि आहेत

ही क्राति येणार असल्याचें भविष्य गाडगिळांनी १९६० सालीं वर्तविलें होतें ते म्हणाले होते .

"नजीकच्या भविष्यात या देशात प्रत्यक्ष राजकीय आर्थिक सत्ता हातीं असणारे, मोठमोठे उद्योगपति, वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि व्यावसायिक गट आणि त्यानी पाठिंबा दिलेले राजकीय पक्ष एका बाजूला आणि सर्वसामान्य जनता दुसऱ्या बाजूला असा सघर्ष होणें निश्चितपणे अपरिहार्य आहे" (पा १६).

या महान सघर्षाचा स्फोट १९६७ सालीं झाला आणि सत्ताधारी काँग्रेस पक्षाला आपली भूमिका बदलावी लागली त्याबरोबर आतापर्यंत सतत केवळ त्रयस्थ उपदेशकाची भूमिका घेणाऱ्या गाड-गिळानी नियोजन-मडळाचें अध्यक्षपद स्वीकारण्यास, म्हणजे जवळ जवळ त्याचें नेतृत्व करण्यास समति दिली परतु व्यवहाराच्या आणि कृतीच्या बाबतींत ज्या तत्त्वांचा आणि नियमांचा गाडगिळानी दीर्घकाळ प्रचार केला आणि सरकार आणि नियोजन मंडळ यांनी त्याप्रमाणे वागावें असें त्याचें म्हणणें होतें, त्या तत्त्वांना आणि निय-माना मान्यता देणें श्रीमती गांधी यांच्या नेतृत्वाखाली असलेला सत्ताधारी गट किंवा श्रीमती गाधीचे अनुयायी किंवा प्रस्थापित हितसबंधी यांपैकी कोणालाच शक्य नव्हतें नव्या सत्ताधाऱ्याना सुद्धा निग्रही, बुद्धिवादी, तडजोडविरोधी आणि मक्तेदारी विरोधी असा विचारवत नियोजन-मडळाचा उपाध्यक्ष म्हणून नको होता. त्याना हवा होता एक दरबारी सेवक तसे गाडगीळ नव्हते म्हणून ते त्याना पचवू शकले नाहीत – त्याचें अर्थशास्त्र, त्याचें राजकारण, त्यांचा शुद्ध व्यवहार फार काय अगदी अपरिहार्य कोंडी टाळावी म्हणून कांही वेळेला त्यानी सुचविलेल्या तडजोडी यापैकी कांही काही ते पचवू शकले नाहीत आपल्या ठाम मताना आवर किंवा मुरड घालण्यास ते तयार असत, परतु मक्तेदारी भाडवलशाहीबाबत त्यांची जी भूमिका होती ती सोडण्यास ते कधीच तयार झाले नाहीत नोकरशहा, ऐतखाऊ आणि लब्धप्रतिष्ठितांनी लढाई जिंकली आणि तत्त्वनिष्ठ विचारवताचा पराभव झाला. नियोजन-मडळा-

पासून गाडगीळ दूर झाले आणि त्याचबरोबर या जगाचाहि त्यांनी निरोप घेतला आपली लढाई त्यानी संपविली भारताची अर्थव्यवस्था आणि राजकारण यासंबंधी अत्यंत सखोल विवेचन त्यानी आपल्या निवेदनातून केलें आहे. त्याच्या रूपाने गाडगिळानी आपले प्रतिभाशाली विचार मागे ठेवले आहेत भूतकालीन गुलामगिरीच्या शृंखलाचे व्रण ज्याचे अजून बुजलेले नाहीत अशा आपल्या नव-स्वतंत्र देशाच्या विकसनशील अर्थव्यवस्थेत क्रांतिकारी लोकशाहीची प्रस्थापना करण्यासाठी जे झगडत आहेत अशा सर्वांना हे विचार मार्गदर्शक झाल्याशिवाय रहाणार नाहीत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र.

प्रस्तावना पृष्ठ पाचवर पहिल्या ओळीत 'रॉबिन्स' ऐवजी 'रॉबिन्सन' आणि पृष्ठ सातवर चौथ्या परिच्छेदातील तिसऱ्या ओळीत 'लेंग' ऐवजी 'लांग' असे वाचावे.

RI I BK-0018448